CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २० मे २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ४८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विधान भवनाच्या प्रवेशद्वाराला आग

- अग्निशमन दलाच्या जवानांनी मिळवले नियंत्रण
- आमदार सुरक्षित, शॉर्टसर्किटने आग लागल्याचा अंदाज





**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ मे-**

विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन तोंडावर आले असताना मुंबईतील विधान भवनाच्या प्रवेशद्वारालगत आग लागल्याची घटना घडली आहे. ही आग नेमकी कशी लागली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण ती शॉर्ट सर्किटमुळे लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

मुंबईतील विधानभवन परिसर नेहमीच गजबजलेला असतो. येथे सदैव नेते व त्यांच्या कार्यकर्त्यांची गर्दी असते. एवढेच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकही येथे आपल्या समस्या घेऊन येत असतात. त्यामुळे सोमवारी दुपारी अचानक विधान भवनाच्या प्रवेशद्वारालागत आग लागल्यामुळे एकच गोंधळ उडाला. यासंबंधीच्या माहितीनुसार, विधान भवनाच्या प्रवेशद्वारालगतच्या परिसरात ही आग लागली आहे. तेथून धुराचे काळे लोट बाहेर येत आहेत. अधिकाऱ्यांनी तत्काळ ही माहिती अग्निशमन दलाला दिली. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. ही आग नेमकी कशी लागली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण प्रवेशद्वारालगत असणाऱ्या स्कॅनिंग मशीनमध्ये शॉर्ट सर्किट झाल्यामुळे ती लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### शॉर्ट सर्किटमुळे आग?

आगीची घटना घडली तेव्हा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर विधान भवनातील एका कार्यक्रमात होते. त्यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतील. स्थितीचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज व्यक्त केला. विधान भवनाच्या रिसेप्शन एरियात जी स्कॅनिंग मशीन असते, त्यात शॉर्ट सर्किट झाल्यामुळे छोट्या प्रमाणात ही आग लागली आहे. ती नियंत्रणात आलेली आहे. अग्निशमन दलाच्या गाड्या थोड्याच वेळात येथे येत आहेत. परंतु स्थिती नियंत्रणात असल्यामुळे कुणीही चिंता करण्याची गरज नाही. तूर्त, स्कॅनिंग मशीनमधील शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सर्वजण सुरक्षित आहेत, असे नार्वेकर म्हणाले.

### सुरक्षेत चूक नाही, हा केवळ अपघात : नार्वेकर

पत्रकारांनी यावेळी त्यांना सुरक्षेतील चुकीसंबंधीचा प्रश्न केला. पण राहुल नार्वेकरांनी तो धुडकावून लावला. हा एक अपघात आहे. ही आग इस्टाब्लिशमेंटच्या कनेक्शनमध्ये लागली नाही. स्कॅनिंग मशीनमध्ये काही बिघाड झाल्यामुळे शॉर्ट सर्किट झाले असेल. स्थिती पूर्णतः नियंत्रणात आहे. सर्वजण सुरक्षित आहेत. कोणत्याही प्रकारची हानी झाली नाही. मशिनच्या नुकसानीसंदर्भात आढावा घेऊन पुढील निर्णय घेतला जाईल, असे नार्वेकर म्हणाले.

# शेतकऱ्यांना सिबल स्कोअरची अट न घालता कर्ज द्या; मुख्यमंत्र्यांची बँकांना ताकीद

## ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटींच्या पतपुरवठा आराखड्यास मंजुरी



**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १९ -**

शेतकऱ्यांना कृषी कर्जाचा पुरवठा झाला नाही तर त्याचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेसोबतच शेतकरी आत्महत्यांमध्ये होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना सिबल स्कोअर मागू नका, हे वारंवार सांगितले, तरी बँका सिबल स्कोअर मागतात. त्यावर आजच्या बैठकीतच तातडीने तोडगा सांगा. यापूर्वी अशा बँकावर शासनाने एफआयआर पण केले आहेत. हा विषय तुम्हालाच गांभीर्याने घ्यावा लागेल. रिझर्व्ह बँकेने सुद्धा कृषी कर्जाबाबत स्पष्टता दिली आहे. जर कोणती बँक शाखा सिविल स्कोअर मागत असेल तर त्या शाखेवर कारवाई करण्यात येईल, असा निर्णय आजच्या बैठकीत घ्यावा, अशा स्पष्ट शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकांना तंबी दिली. कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी विशेष प्रयत्न करून यंदाच्या वर्षी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमवारी दिल्या.

राज्यस्तरीय बँकर्स समितीची १६७ वी बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सूचना दिल्या. यावेळी राज्याचे सन २०२५ -२६ या वित्तीय वर्षाचा ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटी रुपयांचा पतपुरवठा आराखडा ही बैठकीत मंजूर करण्यात आला.

महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, शेतकरी हा राज्याचा कणा असून कृषी व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. या भागाकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांनी कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा. हवामान विभागाने यंदा चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती नाही, पीक चांगले येणार आहे. अशात बँकांनी शेतकऱ्यांना अधिक सहकार्य करायला हवे. चांगला पाऊस झाला की कृषी विकासदर चांगला असतो. याचा लाभ बँकांनी ही घ्यावा आणि शेतकऱ्यांनाही द्यावा. कृषी क्षेत्रामध्ये सध्या गुंतवणूक धोरण राबवण्यात येत आहे. त्यामध्ये बँकांची भूमिका महत्वची असून त्यांनी या गुंतवणूकीमध्ये सहभागी व्हावे. कृषी क्षेत्रामध्ये किमान ५ हजार कोटी प्रतिवर्षी गुंतवणुकीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये आता गुंतवणुकीला नवीन संधी उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे बँकांनी शेतकऱ्यांना जास्तीतजास्त पतपुरवठा करावा. त्याचा बँकांना फायदाच होणार आहे. कृषी क्षेत्र आता फक्त सहाय्यक आणि पुनर्वसनात्मक असणार नाही तर एक व्यवसाय म्हणून त्याकडे पाहण्यात येईल. यामध्ये बँकांनी त्यांची भूमिका पार पाडावी. शेतकऱ्यांसाठी आणि या योजनांमध्ये चांगले काम करणाऱ्यांना सन्मानित करण्याचे धोरण ठरवावे. जेणेकरून आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल आणि जे चांगले काम करणार नाही, त्यांची नावे घ्या, त्यांच्यावर पुढच्या बैठकीत नाराजीची नोंद व्यक्त करा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने अर्धा ट्रिलीयन अर्थव्यवस्थेचा टप्पा पार केला असून एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था होण्याकडे वेगाने वाटचाल सुरू आहे. एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था होण्यामध्ये बँकांची भूमिका महत्वाची आहे. थेट परकीय गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. दावोस मधून राज्यात १६ लाख कोटींची थेट गुंतवणूक आली आहे. महाराष्ट्र आता स्टार्टअप्सची राजधानी आहे. या क्षेत्राकडे ही बँकांनी लक्ष द्यावे. त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. एसएसएमईमध्येही राज्य प्रथम क्रमांकावर असून त्यामध्ये गुंतवणुकीस चांगल्या संधी आहेत. बँकांनी आणि शासनाने मिळून एमएसएमईच्या केंद्र आणि राज्याच्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी एकत्र प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे राज्यासह देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत होणार आहे. तसेच पर्यटन, सेवा क्षेत्र यावर बँकांनी प्रथमिकतेने लक्ष केंद्रीत करावे असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, कृषी कर्ज पुरवठ्याचा विषय बँकांनी गांभिर्याने घ्यावा. तसेच कर्ज पुरवठ्याचे १०० टक्के उद्दीष्ट पूर्ण करावे. उद्योजकांना विशेषतः महिला उद्योजकांना बँकांनी सहकार्य करावे. बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे सचिव राज्यस्तरीय बँकर्स समितीचे अध्यक्ष आदेश पांडे, सर्व विभागांचे सचिव, वरिष्ठ अधिकारी आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीचे सदस्य आणि विविध बँकांचे अधिकारी उपस्थित होते.

### गडचिरोलीवर लक्ष केंद्रीत

FPO महाराष्ट्रात मोठ्या संख्येने आहेत. कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये ते महत्वाची भूमिका बजावू शकतात. गडचिरोलीवर अधिक लक्ष केंद्रीत करावे. त्या ठिकाणी उद्योगांचे जाळे तयार होते आहे. बँकांनी त्यांचे प्राधान्यक्रम सरकारच्या सोबतीने ठरवल्यास समग्र विकास होईल. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना अंमलात आणणे ही बँकाची सुद्धा जबाबदारी आहे. त्यातूनच आर्थिक सर्वसमावेशकता साधली जाईल, असेही फडणवीस म्हणाले.

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात सनातन धर्माचा ध्वज फडकला

## ध्वजावर कल्पवृक्ष आणि कामधेनू यांची प्रतिमा



**फोंडा, गोवा, दि. १९ मे-**

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ऐतिहासिक घटना घडली. या वेळी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या शुभहस्ते सनातन धर्माच्या ध्वजाचे आरोहण शंखनाद आणि वेदमंत्रांच्या गजरात करण्यात आले.

यावेळी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांच्यासह सनातनच्या संतांची वंदनीय उपस्थिती लाभली. यावेळी कार्यक्रमाला २३ देशांतील २० हजारांहून अधिक साधक आणि हिंदू धर्मप्रेमी उपस्थित होते. या वेळी 'सनातन हिंदु धर्माचा विजय असो', 'जय श्रीराम'च्या घोषणांनी आसमंत दुमदुमले.

'सनातन धर्माचा ध्वजा'चे वैशिष्ट्य : प्रत्येक मंदिरात जशी ध्वजस्थापना होते, तसे सनातन राष्ट्राशी संबंधित 'सनातन धर्मध्वजा'चे आरोहण करण्यात आले. हा ध्वज राजकीय किंवा संविधानिक नसून आध्यात्मिक स्वरूपाचा आहे. हा 'धर्मध्वज' आहे. 'सनातन हिंदु राष्ट्राची स्थापना' या ध्येयाची विश्वाच्या कानाकोपर्यात असलेल्या हिंदूंना हा ध्वज जाणीव करून देईल. महाभारताच्या युद्धात श्रीकृष्ण आणि अर्जुन ज्या रथावर आरुढ झाले होते, त्या रथावर बसून हनुमंताने जो ध्वज हातात धरला होता, तो सनातन धर्माचा ध्वज होता. हनुमंताचा रंग शेंदरी म्हणजे केशरी आहे; म्हणून सनातन राष्ट्राचा ध्वज केशरी रंगाचा आहे. या ध्वजावर 'कल्पवृक्षाच्या खाली कामधेनु उभी आहे', असे चित्र आहे. कल्पवृक्ष आणि कामधेनु ही दोन्ही 'समृद्धी, पालन-पोषण, संरक्षण अन् श्रीविष्णूचा अभय वरदहस्त' यांची प्रतिके आहेत.

# कुठलाच पात्र लाभार्थी घरकुल सर्व्हेपासून वंचित राहू नये

## प्रशासनाला खबरदारी घेण्याच्या आ. संदीप क्षीरसागरांकडून सूचना

**बीड, दि.१९ मे-**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या सेल्फ सर्व्हे ला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळालेली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचण येत आहे. त्यामुळे कुठलाही लाभार्थी सर्व्हे पासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाने सर्व ग्रामसेवकांना कडक सूचना द्याव्यात, असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिले आहेत.



ग्रामीण भागातील पात्र नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मोबाइलद्वारे सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. तांत्रिक अडचणींमुळे आणि विलंबामुळे कोणताही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता सेल्फ सर्व्हे करण्यासाठी प्रशासनाकडून मुदतवाढही देण्यात आली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक पात्र लाभार्थी हे अशिक्षित आहेत तसेच अनेकांकडे स्मार्टफोन नाहीत, आणि अनेकांना तांत्रिक माहिती नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचणी येत आहेत. या बाबींचा विचार करून गावपातळीवर, ज्या पात्र लाभार्थीना सेल्फ सर्व्हेबाबत अडचणी आहेत त्या लाभार्थींचा सर्व्हे ग्राम सेवकांनी करून द्यावा.

एकही पात्र लाभार्थी सेल्फ सर्व्हेपासून वंचित राहू नये याची खबरदारी घेण्याचे कडक निर्देश ग्रामसेवकांना द्यावेत. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी बीड व शिरूर (का.) यांना दिल्या आहेत.

# १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था निर्माण करण्याची मुंबईची क्षमता

## मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई दि.१९ मे**

चौथ्या मुंबईतील वाढवण बंदर हे जेएनपीटीपेक्षा तीन पटीने मोठे असून आता वाढवण बंदर हे जगात पहिल्या प्रमुख दहा बंदरात गणले जाणार आहे. त्यामुळे हे बंदर पुढील २० वर्षात नवीन अर्थव्यवस्था निर्माण करेल. एकट्या मुंबईत सध्या १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था निर्माण करण्याची क्षमता आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केले.

मुख्यमंत्र्यांनी २०१३-१४ या तुकडीच्या भारतीय विदेश सेवेतील १४ अधिकाऱ्यांशी सह्याद्री अतिथीगृह येथे संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, राजशिष्टाचार विभागाच्या अपर मुख्य सचिव सीमा व्यास आदी उपस्थित होते.

या भेटीदरम्यान झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईच्या विकासासाठी बंदराचा विकास करणे आवश्यक आहे. यासाठी कोस्टल मार्ग तयार करण्यात येत आहे. अटल सेतूमुळे तिसरी मुंबई तयार होत आहे. त्याचबरोबर आता मुंबईत 'एज्यूसिटी' तयार करण्यात येत आहे. या एज्यूसिटीत देशातील १२ विद्यापीठ असतील. ही 'एज्यूसिटी' २०० एकर जागेवर उभी करण्यात येणार असून यामध्ये अंदाजे १ लाख विद्यार्थी शिक्षण घेतील. तसेच ३०० एकर जागेवर इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. मुंबईला तंत्रज्ञानामध्ये सर्वोत्कृष्ट बनविण्यासाठी १००० एकर जागेवर नॉलेज सिटी उभारण्यात येत आहे. विदेश सचिव आणि मुख्यमंत्र्यांमध्ये झालेल्या या संवादात विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्राच्या जागतिक स्तरावरील गुंतवणूक संधी, परराष्ट्र धोरणाशी संबंधित राज्याचा सहभाग, विकसित भारत तसेच महाराष्ट्रातील विविध आंतरराष्ट्रीय प्रकल्पांविषयी विचारविनिमय झाला.







# वजन कमी करण्यासाठी...

**बैठी जीवनशैली, शारीरिक श्रमाचा अभाव आणि चुकीचे खानपान यामुळे आज सर्वच वयाच्या व्यक्तींमध्ये लठ्ठपणाची समस्या भेडसावत आहे. अनेकजण वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करीत असतात. मात्र अपेक्षेप्रमाणे त्यांचे वजन कमी होत नाही. वजन कमी होण्यासाठी योग्य नियोजन असावे लागते. वजन कमी करण्याचे काही सोपे उपाय तज्ज्ञांनी सुचविले आहेत. या घरगुती उपायांनी तुमचे वजन कमी होण्यासाठी निश्चितच मदत होईल.**

**वजन का कमी केले पाहिजे?**

शरीरातील चरबीची जास्त प्रमाणात वाढ झाल्यामुळे लठ्ठपणाची समस्या निर्माण होते व वजन वाढते. लठ्ठपणा किंवा ओबेसिटी ही अशी समस्या आहे की, ज्यामुळे पुढे अनेक धोकादायक आजार होऊ शकतात. हार्ट अटॅक, पॅरालिसिस, डायबेटिस, उच्च रक्तदाब, सांधेदुखी, स्पॉन्डीलायटीस, स्त्रियांमधील पीसीओडी समस्या यासारख्या आजारांमध्ये महत्वाचे कारण म्हणजे गरजेपेक्षा वजन अधिक असणे हे ठरत आहे. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी अतिरिक्त वाढलेले वजन कमी करणे आवश्यक असते.

**हे करा घरगुती उपाय -**

दररोज सकाळी एक कप ग्रीन टी प्यावे. यामुळे शरीरातील चयापचय क्रिया वाढते व वजन लवकर कमी होण्यास मदत होते.

एक ग्लास गरम पाण्यात लिंबाचा रस आणि मध मिसळून दररोज सकाळी उपाशीपोटी प्यावे. ह्या घरगुती उपायामुळे अतिरिक्त कॅलरी बर्न होऊन लवकर वजन कमी होते.

दालचिनी पूड आणि आले घालून केलेला चहा प्या. यामुळेही मेटाबॉलिक रेट वाढतो. त्यामुळे जास्त कॅलरी बर्न होऊन वजन कमी होते.

पाण्यात जिरे टाकून ते पाणी उकळावे. हे जिरापाणी पिण्यामुळे देखील वजन कमी होण्यास मदत होते.

रोज रात्री झोपण्यापूर्वी गरम पाण्यात चमचाभर त्रिफळा चुर्ण मिसळून ते मिश्रण प्यावे. त्रिफळा चूर्णामुळेही मेटाबॉलिक रेट वाढून वजन कमी होण्यास मदत होते.

**वजन कमी करण्याचे दोन मुख्य उपाय -**

वजन कमी करायचे असल्यास योग्य खानपान आणि नियमित व्यायाम या दोन बाबींकडे लक्ष देणे गरजेचे असते. यासाठी जेवणात लो कॅलरीज आणि लो कार्बोहाइड्रेट असणारे पण पौष्टिक पदार्थ असले पाहिजे. यावेळी चरबी वाढवणारे पदार्थ, साखरेचे पदार्थ, मैद्याचे पदार्थ, फास्टफूड वैगेरे खाणे टाळले पाहिजेत. कारण यामुळे शरीरात अनावश्यक कॅलरीज जावून चरबी व वजन वाढत असते. तसेच वजन कमी करण्यासाठी नियमित व्यायाम देखील केला पाहिजे. व्यायामाने शरीरातील कॅलरीज खर्च होऊन वजन कमी होत असते. यासाठी चालणे, पळणे, सायकलिंग, पोहणे, दोरीउड्या, झुंबाडान्स, मैदानी खेळ असे व्यायाम करावेत. ह्या उपायांचा अवलंब केल्यास निश्चितच लवकर वजन कमी होते.



**१) वजन कमी करण्यासाठी योग्य खानपान ठेवा -** वजन कमी करायचे असल्यास लो कॅलरीज आणि लो कार्बोहाइड्रेट असणारा भोजन घेणे गरजेचे असते. तसेच जेवणात प्रोटीन्स, हेल्दी फॅट्स आणि फायबर्सचे प्रमाण अधिक असले पाहिजे. जेवणात हिरव्या पालेभाज्या, फळभाज्या, शेंगभाज्या, विविध फळे, सुखामेवा, मोड आलेली कडधान्ये, कमी फॅटचे दूध, मासे, अंड्यातील पांढरा भाग, ग्रीन टी, लिंबू पाणी यांचा समावेश करावा. कारण या पदार्थांतून शरीराला आवश्यक पोषकतत्वे म्हणजे फायबर्स, खनिजे, व्हिटॅमिन्स आणि प्रोटिन्स मिळते. तसेच दिवसभरात वरचेवर पाणी पीत राहावे. साधारण दररोज किमान ८ ते १० ग्लास पाणी प्यावे.

**२) वजन कमी करण्यासाठी चुकीच्या पदार्थापासून दूर राहा-** वजन कमी करायचे असल्यास चरबी वाढवणारे पदार्थ, मांसाहारी पदार्थातील चरबी, अंड्यातील पिवळा भाग, बटाटा, तेलकट पदार्थ, तुपाचे पदार्थ, साय, लोणी, बेकरी प्रोडक्ट, मैद्याचे पदार्थ, साखर, गोड पदार्थ, केक, बिस्किटे, आईस्क्रीम, चॉकलेट्स, जंकफूड, फास्टफूड, स्नॅक्स, फरसाण, चिप्स, चहा, कॉफी, कोल्ड्रिंक्स, अल्कोहोल इ. पदार्थांपासून दूर राहावे.

वजन कमी करण्यासाठी कार्बोहाइड्रेट असणाऱ्या पदार्थांचे प्रमाण कमी करणे आवश्यक असते. यासाठी बटाटा, साखर, गूळ, मैदा, ब्रेड, गहू, भात यांचे प्रमाण कमी करावे.

**३) जेवणासंबधी चुका टाळाव्यात-** एकाचवेळी भरपेट जेवणे किंवा बराच वेळ उपाशी राहणे, टीव्ही बघत बराचवेळ काहीतरी खात बसणे असल्या चुकीच्या गोष्टी वजन वाढवण्यासाठी कारणीभूत असतात. यासाठी एकाचवेळी भरपेट जेवण्यापेक्षा दिवसातून ३ ते ४ वेळा थोडे थोडे भोजन घ्यावे. बराच वेळ उपाशी राहू नये कारण यामुळे चयापचय क्रिया बिघडून शरीरात चरबी अधिक वाढू लागते. तसेच भूक लागली नसताना विनाकारण काहीही खात बसणे टाळावे. वजन कमी करण्यासाठी जेवणासंबधी वरील चुका टाळाव्यात.

**४) वजन कमी करण्यासाठी व्यायाम-** एक्सरसाइज किंवा शारीरिक कष्ट करून घाम गाळल्याशिवाय वजन कमी करता येत नाही. वजन कमी करण्यासाठी एरोबिक एक्सरसाइज करणे खूप फायदेशीर ठरते. यासाठी दररोज ४५ मिनिटे एक्सरसाइज केला पाहिजे.

यासाठी मोकळ्या हवेत चालण्यास जावे, जॉगिंग, सायकलिंग, पोहणे, झुंबा डान्स, पायऱ्या चढणे-उतरणे, मैदानी खेळ, दोरीउड्या, योगासने यासारखे एक्सरसाइज करावेत. या एक्सरसाइजमधून जास्तीत जास्त कॅलरी बर्न होऊन वजन कमी होण्यासाठी मदत होते.

**५) वजन कमी करण्यासाठी तणावापासून दूर राहा-** मानसिक तणाव, अपुरी झोप ही कारणे सुध्दा वजन वाढवण्यासाठी कारणीभूत असतात. त्यामुळे मानसिक ताणतणावापासून दूर राहावे यासाठी प्राणायाम, ध्यान-धारणा करू शकता. तसेच रात्री पुरेशी झोप घ्यावी. दुपारी झोपणे टाळावे. आणि झोपण्याच्या ३ ते ४ तास अगोदर जेवण करावे.

**किती वजन कमी झाले पाहिजे?**

दर आठवड्याला साधारणपणे केवळ १ ते २ पौंड (म्हणजे अर्धा ते एक किलो) वजन कमी करण्याची शिफारस केली जाते. ह्या प्रमाणातच वजन कमी केल्यास वजन अनेक दिवस आटोक्यात राहते. तसेच वजन कमी करण्यासाठी उपाशी राहणे हा काही उपाय होत नाही. कारण आपण जे अन्न घेत असतो त्यातूनच शरीराला ऊर्जा मिळत असते. त्यामुळेचं शरीरक्रिया व्यवस्थित चालतात. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी कोणी उपाशी राहण्याचा विचार करत असेल तर, तो अत्यंत चुकीचा पर्याय आहे. यामुळे शरीराला फायदा होण्यापेक्षा नुकसानच होत असते. योग्य खानपान ठेवल्यास आणि नियमित व्यायाम केल्यास सहजतेने वजन कमी होत असते. आणि हाच वजन कमी करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.


# सुंदर आणि निरोगी केसांसाठी...

**आपले केस कसे आहेत यात आनुवंशिकता महत्त्वाची भूमिका बजावते. परंतु आपला आहार, जीवनशैली व वातावरण यांचाही आपल्या केसांवर मोठा परिणाम होतो. केसांची काळजी घेण्याचा तुमचा एकूण दृष्टीकोन कसा आहे, यावरही तुमच्या केसांचे आरोग्य ठरते. आपल्या डोक्याच्या संरक्षणासाठी असलेले आपले केस सुंदर, लांब व दाट असावेत असे प्रत्येकालाच वाटते. पण त्यासाठी केसांची काळजी अगदी दक्षतेने घ्यावी लागते. केस गळतीवर घरगुती उपाय करता येतात. केसांचे आरोग्य राखण्यासाठी व त्यांची काळीज घेण्यासाठी पुढील टिप्स...**

केसांच्या आरोग्यासाठी प्रथिने अत्यंत आवश्यक आहेत. केस आणि टाळूच्या आरोग्यासाठी योग्य आहार हा एक महत्त्वाचा घटक आहे. केस प्रामुख्याने प्रथिनांपासून बनलेले असतात, म्हणून दररोज आहारात किमान ४५ ग्रॅम प्रथिने घ्या.

प्रोटीनच्या कमतरतेमुळे केस कमकुवत व ठिसूळ केस होतात. तसेच ते निस्तेज होतात व गळतात. झिंकच्या कमतरतेमुळे केस गळू शकतात. यासाठी आहारात नट्स, अक्रोड, पेकान, काजू आणि बदाम यांसारख्या पदार्थांचा समावेश करा. तसेच आहारात भरपूर प्रमाणात भाज्या, फळे, हिरव्या पालेभाज्या, सॅलड्स घ्या. व भरपूर प्रमाणात पाणी प्या. तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने मल्टीव्हिटॅमिन सप्लिमेंट घ्या.

ओमेगा -३ फॅटी ॲसिडचे सेवन वाढवल्याने केसांची मुळे आणि सेबेशियस ग्रंथी उत्तेजित होऊ शकतात. यामुळे टाळूचे आरोग्य सुधारते. तुम्ही आठवड्यातून किती वेळा केसांना शॅम्पू लावता यावर देखील केसांचे आरोग्य अवलंबून असते. तुमचे केस तेलकट असतील तर तुम्हाला जास्त वेळेला केस धुण्याची गरज असते. आपल्या केसांची गरज ओळखून त्यानुसार केस धुण्याचे वेळापत्रक ठरवा व शक्यतोवर ऑरगॅनिक उत्पादनांचा वापर करा.



केसांसाठी योग्य शॅम्पू निवडा. चुकीचे शॅम्पू आणि स्टाइलिंग एजंट वापरल्याने केसांचे नुकसान होऊ शकते. तुमच्या केसांच्या प्रकारासाठी योग्य असलेली उत्पादने निवडा. अमोनियम लॉरील सल्फेट किंवा सोडियम लॉरील सल्फेट सारखे कठोर घटक असलेले शॅम्पू शक्यतोवर टाळा.

केस धुतल्यावर त्यांचे कंडिशनिंग करणे ही केस मऊ, चमकदार ठेवण्यासाठी एक महत्त्वाची पायरी आहे. तुमच्या केसांसाठी कोणते कंडिशनर योग्य आहे हे शोधून काढा व ते वापरा. दिवसातून एकापेक्षा जास्त वेळा केस धुवू नका. केस धुताना खूप गरम किंवा खूप थंड पाणी वापरणे टाळा. केस ओले असताना हळूवारपणे हाताळा कारण ते ओले असताना तुटण्याची शक्यता जास्त आहे. ओले केस टॉवेलने जास्त खसाखसा पुसू नका.

विलग करण्यासाठी जाड व रुंद दात असलेला कंगवा वापरा, परंतु ओले केस जास्त ब्रश करू नका. केस ब्लो ड्राय करताना सर्वात कमी सेटिंगपासून प्रारंभ करा आणि आवश्यकतेनुसार हळूहळू उष्णता वाढवा. जेव्हा शक्य असेल तेव्हा तुमचे केस नैसर्गिकरित्या हवेत कोरडे होऊ द्या. केसांच्या वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी आणि रक्ताभिसरण वाढविण्यासाठी आपल्या टाळूला नियमितपणे मालिश करा.

**केस निरोगी ठेवण्यासाठी आणि तुटणे टाळण्यासाठी -** प्रत्येक १० ते १२ आठवड्यांनी - नियमितपणे केसांना खालून कट द्या.

**बरेचदा शरीरामध्ये एखाद्या ठिकाणी बिघाड झाला तर त्याची लक्षणे शरीराच्या बाह्य अंगांवर दिसून येतात. शरीराच्या अंतर्गत भागांमध्ये कुठलीही आरोग्यविषयक समस्या निर्माण व्हायला लागली तर तिचे लक्षणे शरीरावर जाणवतात. त्यामुळे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे ठरते. आता लिव्हर म्हणजेच यकृत आपल्याला सगळ्यांना माहिती आहे. लिव्हर हा शरीरातील महत्त्वाचा अवयव आहे. यामध्ये समस्या निर्माण झाली तर त्याचे अनेक लक्षणे शरीरावर दिसतात. त्यातील महत्त्वाचे म्हणजे पायावर देखील लक्षणे दिसू शकतात. लिव्हरमध्ये काही समस्या निर्माण झाली असेल तर पायांवर कोणती लक्षणे दिसतात? याबद्दल जाणून घेऊ...**

# पायावरचे 'हे' संकेत धोकादायक

**पायांवर दिसणारी लक्षणे-**

**१- पायावर येते सूज-** तज्ञांच्या मते, जर पायावर किंवा तळपायांवर सूज दिसत असेल तर हे यकृतासंबंधी समस्यांच्या संकेत असू शकतो. उदाहरणच घ्यायचे झाले तर फॅटी लिव्हर डिसीज, सोरायसिस किंवा हेपिटायटीस बी अथवा सी इत्यादी समस्या असू शकतात.

**२- पायावर मुख्यत्वे तळपायावर येणारी खाज-** हेपेटायटिसच्या काही रुग्णांमध्ये हात आणि तळ पायावर खाज येण्याची समस्या उद्भवते. या शिवाय यकृताच्या आजारामुळे देखील हात आणि पायांचे त्वचा जास्त कोरडी होते व खाज येते.

**३- तळपायावर वेदना जाणवणे-** समजा तळपायावर जर वेदना जाणवत असतील तर समस्या लिव्हर डिसीजमुळे होऊ शकते. ज्यावेळेस लिव्हर व्यवस्थित काम करू शकत नाही. त्यावेळी एडिमामध्ये द्रव्य जमा होणे सुरू होते. पायांमध्ये पेरिफेरल न्युरोपॅथीलाही क्रोनिक लिव्हर डिसिज सोबत जोडून बघितले जाते. लिव्हरमध्ये समस्या झाल्यावर तळपायामध्ये वेदना आणि सूज येते.

**४- पाय सुन्न किंवा बधीर होणे-** लिव्हरच्या आरोग्यविषयक समस्याने त्रस्त लोकांना हेपिटायटीस सी इन्फेक्शन किंवा अल्कोहोलिक लिवर डीसीजमुळे पाय सुन्न होण्याची किंवा पायात झीनझीन्या येण्याची समस्या उद्भवते. तसे पाहायला गेले तर मधुमेहाच्या पेशंटमध्ये देखील ही समस्या पाहायला मिळते. लिव्हरच्या समस्येने ग्रस्त असलेल्या लोकांमध्ये ही समस्या दिसणे खूप सामान्य आहे. कारण लिव्हर ग्लुकोज लेव्हल कंट्रोल करण्यासाठी मदत करते.




# दुधी भोपळा खाण्याचे फायदे

**दुधी भोपळ्यामध्ये गोड आणि कडू असे दोन प्रकार असतात. दुधी भोपळा हे वेलीवर येणारे फळ आहे. गोड दुधी भोपळ्याचा उपयोग खाण्यासाठी करतात. कडू दूधी भोपळ्याला तुंबड्या असे म्हणतात. खाण्यासाठी नेहमी कोवळ्या दुधीचा उपयोग करावा.**



**सरळ गुणधर्म :-** दुधी भोपळा थंड, सारक, पौष्टिक, गोड, धातुवर्धक, रुचकर, हृदयास हितकारक आणि पित्त व कफहारक आहे. दुधी भोपळ्याचा ताजा रस मातेच्या दूधाप्रमाणे पोषक असतो. कडू दुधी भोपळ्याचा उपयोग पाण्यात पोहण्यासाठी पेटा तयार करण्यासाठी करतात, तर चवीला गोड असणारा दुधी भोपळा औषधासाठीही वापरतात.

**दुधी भोपळ्यातील घटक :** पाणी ९६.३ टक्के, प्रोटिन ०.२ टक्के, चरबी ०.१ टक्के, कार्बोदित पदार्थ २.९ टक्के, कॅल्शियम ०.०२ टक्के, फॉस्फरस ०.०१ टक्के, लोह०.७ मि. ग्रॅम.

**दुधी भोपळ्याचे औषधी उपयोग :-** मधुमेही रुग्णांना दुधी भोपळ्याच्या रसाचा उपयोग होतो. कारण यात कार्बोदित पदार्थ कमी असतात. तापामध्ये या रसाचे सेवन करावे. वाफवलेला दुधी भोपळा खाल्ल्याने बद्धकोष्ठता नाहीशी होते आणि रक्ताम्लता कमी होते. तसेच दुधी भोपळ्याच्या सेवनाने हृदय बलवान होते. दुधी भोपळ्याच्या रसाच्या नियमित सेवनाने वजन संतुलित राहते. हृदयविकार होत नाहीत. बायपास सर्जरीसारख्या महागड्या सर्जरींपासून मुक्ती मिळते. दुधी भोपळ्याचा रस नेहमी ताजा घ्यावा. त्यामध्ये थोडी जिरे पूड आणि शेंदेलोण व पांदेलोण घालावे. क्षयरोग्यांना दुधी भोपळ्याचा रस दिल्याने त्यांचा खोकला कमी होतो व त्यांचे वजनही वाढते. दुधी भोपळ्याच्या रसाचे सेवन गरोदरपणात शक्तिवर्धक असते. दुधी भोपळ्याच्या रसात थोडा मध घालून प्यायल्याने शरीराचा दाह, घशाची जळजळ, रक्तविकार, गळवे, सर्दी, नाकातून रक्त पडणे वगैरे विकार नाहीसे होतात. सर्व प्रकारच्या मूत्रविकारात दुधी भोपळा गुणकारी आहे.

नियमित व्यायामानंतर दररोज १०० ग्राम दुधी भोपळ्याचा रस प्यायला हवा. हा रस प्यायल्याने बरेच तास आपले पोट भरल्यासारखे राहते व त्यामुळे भूक लागत नाही आणि वजन नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे दुधी भोपळा मीठ टाकून उकडून खाल्ल्याने काही दिवसातच वजन कमी होण्यास मदत होते. यात असलेले फायबर अधिक मात्रेत असल्यामुळे भूक कमी लागते व पोट भरल्या सारखे राहते.

**उच्च रक्तदाब नियंत्रित ठेवते :-** जर आपण नियमित पणे एक ग्लास दुधी भोपळ्याचे रस पीत असाल तर आपले उच्च रक्तदाबाची समस्या अधिक प्रमाणात नियंत्रित राहील. हा रस दररोज ग्राम प्यायल्याने रक्तातील कोलेस्ट्रोल प्रमाण कमी करण्यास मदत होते.

**लघवीसाठी उपयोगी :-** दुधी भोपळा शरीराला थंडावा देतो. ह्याचा रसात अधिक मात्रेत पाणी असते जे आपल्या शरीराला थंड ठेवते. म्हणून उन्हाळ्याच्या दिवसात दुधी अधिक प्रमाणत खाल्ला जातो. जर आपल्याला लघवी करताना जळजळ होत असेल तर आपण दररोज सकाळी दुधी भोपळ्याचा रस सेवन करावा. कारण जळजळ लघवीमध्ये ॲसिड चे प्रमाण वाढल्यामुळे होते, आणि दुधी भोपळ्याच्या रसामुळे मिळणार्या थंडावाने हे ॲसिडचे प्रमाण कमी होते.

**केसांवर गुणकारी :-** दुधी भोपळ्याचा रस प्यायल्याने वा त्या रसात तिळाचे तेल मिसळवून हे आपल्या केसांच्या मुळाशी लावल्याने केस गळती कमी होण्यास मदत होईल. तसेच आवळ्याच्या रसात दुधी भोपळ्याचा रस मिसळवून प्यायलाने केसातील कोंडा कमी होण्यासदेखील मदत होते.

**दात आणि हिरड्या स्वच्छ करा :-** दात घासण्याचा आणि फ्लॉस करण्याचा एक योग्य मार्ग आहे. यासाठी मऊ ब्रिस्टल्ड ब्रश आणि फ्लोराइड टूथपेस्टने सर्व बाजूंनी हळूवारपणे दात घासावेत. तसेच दर ३ ते ४ महिन्यांनी तुमचा टूथब्रश बदलावा. त्याच वेळी, तोंड स्वच्छ ठेवण्यासाठी हलका ब्रश वापरा.

डेंटल फ्लॉस, प्रीथ्रेडेड फ्लॉसर, वॉटर फ्लॉसरने दात स्वच्छ करा. हे दातांमध्ये अडकलेले अन्न काढून टाकते, जिथे टूथब्रश देखील पोहोचू शकत नाही. फ्लॉसनंतर खळखळून चूळ भरा. निरोगी दात आणि हिरड्यांमुळे चांगल्या अन्नाचा आस्वाद घेणे सोपे जाते, तर पिवळ्या दातांमुळे आपल्याला लाज वाटते. दातांचा पिवळेपणा दूर करण्यासाठी लोक अनेक महागडे उपाय करून पाहत असले तरी जास्त फरक पडत नाही. मग घरगुती उपाय का करू नयेत? काही नैसर्गिक उपायांमुळे दातांचा पिवळेपणा तर दूर होईलच पण ते निरोगी आणि मजबूत देखील होतील.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



**खुलताबाद :** खुलताबाद येथील पंचायत समिती सभागृहात सहाय्यक गट विकास अधिकारी गोरख पवार यांच्या हस्ते, दैनिक सोलापूर तरुण भारत खुलताबाद तालुका प्रतिनिधी संतोष करपे यांना देण्यात आला यावेळी ज्येष्ठ पत्रकार वसंत शिरसाट गल्लेबोरगावकर सुधाकर जेठे नाईन शहा यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

## महत्वाचे...

### एमजीएम रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्याने मिळवले पेटंट

**छत्रपती संभाजीनगर, दि.१९ मे-**

महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी दत्तात्रेय चौधरी याचे संशोधन भारत सरकारने पेटंट म्हणून प्रकाशित केले आहे. 'अमोरफस एलक्साडोलिन तयार करण्याची सुधारित प्रक्रिया' या विषयावर त्यांने पेटंट प्रकाशित केले आहे. हे पेटंट मिळाल्याबद्दल दत्तात्रेय चौधरी याचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम,कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, संचालक डॉ.अण्णासाहेब खेमनर, डॉ.के.एम. जाधव व सर्व संबंधितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. पोट विकार व संबंधित इरिटेबल बोवेल सिंड्रोमवर उपचार करण्यासाठी एलक्साडोलिनचा वापर केला जातो. एलक्साडोलिन हे म्यू-ओपिओइड रिसेप्टर अॅगोनिस्ट नावाच्या औषधांच्या वर्गात आहे. ते आतड्याची क्रिया कमी करून कार्य करते व पोटातील चयापचय प्रक्रिया सुरळीत पार पडते. या संशोधनासाठी रसायनशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.सूर्यकांत सपकाळ व डॉ. सुचिता गादेकर यांनी दत्तात्रेय चौधरी यांस मार्गदर्शन केले.



### 'वामा - लढाई सन्मानाची'चा टिझर प्रदर्शित

**छत्रपती संभाजीनगर, दि.१९ मे-**

स्त्रीशक्तीच्या प्रखरतेचा नवा अध्याय उलगडणारा 'वामा - लढाई सन्मानाची' या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. कश्मीरा कुलकर्णी हिच्या दमदार अभिनयाने सजलेला हा टीझर स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध तिचा आक्रोश आणि सन्मानासाठीचा संघर्ष मांडतो. एका विवाहित स्त्रीचा तिच्या पतीच्या अत्याचाराविरोधातील लढा, तिच्या स्वाभिमानाची लढाई आणि त्या संघर्षातून निर्माण झालेला तिचा आत्मविश्वास हे सारं या टीझरमध्ये पाहायला मिळत आहे. या चित्रपटात स्त्रीच्या सन्मानाची, अस्तित्वाची व स्वातंत्र्याची लढाई पाहायला मिळेल. चित्रपटाच्या टीझरने प्रेक्षकांची उत्सुकता प्रचंड वाढवली आहे. ओंकारेश्वरा प्रस्तुत आणि सुब्रमण्यम के. निर्मित या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन अशोक आर. कोंडके यांनी केले असून येत्या २३ मे रोजी 'वामा- लढाई सन्मानाची' चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. यात कश्मीरा कुलकर्णी, डॉ. महेश कुमार, गणेश दिवेकर, जुई बी त्यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

### इन्फोसिस फाऊंडेशनकडून पारितोषकांसाठी अर्ज पाठवण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर, दि.१९ मे-**

इन्फोसिस फाऊंडेशन या इन्फोसिसच्या परोपकार आणि सीएसआर विभागाने आपल्या आरोहण सोशल इनोव्हेशन अॅवॉर्ड्सच्या चौथ्या आवृत्तीची घोषणा केली आहे. भारतात सामाजिक नवचैतन्याला चालना देण्याप्रति आपली वचनबद्धता स्पष्ट करताना इन्फोसिस फाऊंडेशन या पुरस्कारांत सहभागी होण्यासाठी देशभरातील नवप्रवर्तक आणि सामाजिक उद्योजकांना पारितोषकांसाठी अर्ज पाठवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आरोहण सोशल इनोव्हेशन अॅवॉर्ड्स २०२५ चे उद्दिष्ट भारतातील वंचित समुदायांवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पाडण्याची क्षमता असलेल्या अद्वितीय तंत्रज्ञान-आधारित उपायांचा विकास करणाऱ्या व्यक्ती, संघटना, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक उपक्रमांचा गौरव करून पारितोषिक देण्याचा आहे. इन्फोसिस फाउंडेशन प्रत्येक विजेत्याला ५० लाख रुपयांपर्यंत बक्षीस देण्याचे वचन देते. त्याची एकूण बक्षीस रक्कम २ कोटी रुपयांची आहे. आरोहण सोशल इनोव्हेशन अॅवॉर्ड्स २०२५ मध्ये शिक्षण, आरोग्यसेवा ,पर्यावरणीय शाश्वतता या तीन श्रेणींमध्ये अर्ज १५ जून पर्यंत स्वीकारले जातील. १८ वर्षे वयावरील भारतात राहणाऱ्या नागरिकांसाठी प्रवेशिका खुल्या आहेत. सहभागी व्हिडिओजच्या स्वरूपात आपल्या कामाचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या प्रवेशिका दाखल करू शकतात. ते आरोहण सोशल इनोव्हेशन अॅवॉर्ड्सच्या वेबसाइटवर अपलोड केले जातील. आणि प्रवेशिका पूर्णपणे कार्यरत प्रोटोटाइप किंवा पूर्ण झालेला प्रकल्प असावा. ती फक्त एक संकल्पना, कल्पना किंवा माहिती नसावी.

### मेलोडी डुओ एक क्रांतिकारी बुरशी नाशकाचे अनावरण

**नाशिक, दि.१९ मे-**

आपल्या शेतकऱ्यांना अत्याधुनिक कृषी नवोपक्रमांनी सशक्त करण्याच्या दिशेने धानुका ग्रिटेक लिमिटेडचे महत्त्वपूर्ण पाऊल म्हणजे, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बुरशीनाशक मेलोडी डुओ शेतकऱ्याना उपलब्ध करून देण्यासाठी इगतपुरी महाराष्ट्र येथे मेलोडी डुओचा अनावरण सोहळा दिनांक १६ मे २०२५ रोजी आयोजित केला होता. मेलोडी डुओ ब्रँडचे जागतिक अधिग्रहणाची औपचारिक घोषणा सदर कार्यक्रमात केली गेली. या अधिग्रहणामुळे धानुका ग्रिटेक लिमिटेडला २० देशांमध्ये मेलोडी डुओ पुरवण्याचा अधिकार मिळाला आहे. या प्रसंगी धानुका ग्रिटेक लिमिटेडचे मान्यवर वितरक, कृषि शास्त्रज्ञ तसेच धानुकाचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम श्री. संजय पाटील (जनरल मॅनेजर) यांच्या नेतृत्व खाली आणि श्री. दीपक नरवाडकर आणि श्री. घनःश्याम इंगळे (विषय वस्तु तज्ञ) यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला. या कार्यक्रमामध्ये धानुकाने शेतकऱ्यांची उत्पादकता वाढवण्याचा आणि त्यांच्या समृद्धीसाठी कार्यरत राहण्याच्या संकल्पाचा पुनरुच्चार केला.

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
क्षेत्रीय कार्यालय – अहमदनगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला छत्रपती संभाजीनगर शाखेकरिता प्रामुख्याने तळमजल्यावर पैठण गेट परिसरात सर्व सुविधा असलेली १७०० स्क्वे फुट (+ – १०%) कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेचे ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in / www.unionbankofindia.co.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. ११/०६/२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. १९/०५/२०२५
अहिल्यानगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय, अहमदनगर

# टपोऱ्या थेंबाच्या 'अवकाळी' ने शहराला झोडपले

## ●सव्वा-दीडतास धुवाधार, वाहनधारकांसह पादचाऱ्यांची दैना

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर दि. १९ मे-**

पावसाळा सुरू व्हायला अद्याप काही दिवसांचा अवधी असताना रविवारी, १८ रोजी टपोऱ्या थेंबांच्या 'अवकाळी' ने सव्वातास शहर परिसराला अक्षरशः झोडपून काढले. दुपारी एकवाजेच्या सुमारास आकाशात ढग दाटून आले. ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटात सव्वातास जोरदार पाउस झाला. शहर परिसरातील नाले दुथडी भरून वाहवले तसेच सखल रस्त्यांवर धो...धो वाहणाऱ्या पाण्यातून वाहनधारकांसह पादचाऱ्यांना मार्ग काढावा लागला. शहरातील खाम नदीही दुथडीभरून वाहिली. चिकलठाणा वेधशाळेने या पावसाची नोंद ७९.४ मि. मी. एवढी केली आहे.

अवकाळी पावसाने शिवाजीनगरचा नव्यानेच बांधलेला भुयारी मार्ग तुडुंब भरून वाहत होता. पावसाळ्यापूर्वीच्या पावसाने ही रविवारी शहर परिसरात सर्वत्र दाणादाण उडवून दिली. बहुप्रतीक्षित शिवाजीनगर भुयारी मार्ग अखेर सुरू झाला आणि स्थानिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. हा मार्ग चुकीच्या पद्धतीने बांधल्याची ओरड आहे. त्यामुळे यात किरकोळ दुरुस्ती करून अखेरीस धुमधडाक्यात या भुयारी मार्गाचे लोकार्पण करण्यात आले. परंतु पावसाळ्यापूर्वीच झालेल्या पहिल्याच जोरदार 'अवकाळी' ने भुयारी मार्ग तुडुंब भरल्याने नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली. मिटमिटा, पडेगाव, छावणी, बेगमपुरा, जुने शहर, मुकुंदवाडी, चिकलठाणापर्यंत तास-दीडतास पावसाने सर्वांची तारांबळ उडाल्याचे दिसून आले.



दुपारी सव्वा ते दीडतास कोसळलेल्या मुसळधार 'अवकाळी' ने आणि सतत पडलेल्या हलक्या पावसामुळे आधीच अरुंद व चुकीच्या पद्धतीने बांधलेल्या भुयारी मार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. त्याचा निचरा होण्यास पुरेशी जागा नव्हती. त्यातच ये-जा करणारी वाहने अडकल्याने वाहनधारकांपुढे संकट उभे राहिले. प्रचंड पाणी साचल्याने शिवाजीनगर रेल्वे गेट क्रमांक १३ वरून पुढे जाणे शक्य नाही, याचा अंदाज घेऊन अनेक चारचाकी, अवजड वाहने माघारी येत तेथून जाऊ लागली. यामुळे भुयारी मार्गावर साचलेले नदीसदृष्य पाणी व वाहतुकीची दुर्दशा असे चित्र बायपासलगत तयार झाले होते.

दरम्यान, अवकाळीने भुयारी मार्गाची झालेली अवस्था पाहून तेथील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त करत लोकप्रतिनिधींवर चांगलेच तोंडसुख घेतले. सातारा देवळाई परिसराला सातत्याने सावत्रपणाची वागणूक दिली जात असल्याने आम्ही त्याची फळे भोगत आहोत, अशा प्रतिक्रिया नागरिकांकडून ऐकायला मिळाल्या.

साडेतीन कोटींचे रस्ते, भुमिगत गटार योजना, जलवाहिनीची कामे येथे सुरू झाली असली तरी आता त्या कामांच्या गुणवत्तेबाबतही रहिवाशांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.सातारा देवळाई परिसराकडे कायमच दुर्लक्ष केले आहे. सर्वांनी रस्ता, उड्डाणपूल, भुमिगत गटार योजना जलवाहिनीची कामे जेमतेम सुरू केली तेव्हा वाटले २००८ पासून काहीच सुविधा नाही, आता उशिरा का होईना सुविधा येत आहेत म्हणून प्रत्येक नागरिकांनी अडचणींना मात करत प्रशासनाला सहकार्य केले. मात्र शिवाजीनगर भुयारी मार्ग, बीड बायपास, देवळाई रोड ही सर्व कामे एकाच ठेकेदाराला कशी दिली गेली ? यामुळे सातारा देवळाई परिसराची वाट लागली असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या स्मिता पटारे म्हणाल्या.

✔ **दोनतास वाहतूक ठप्प :** या पावसाने शिवाजीनगर रेल्वेगेटचा भुयारीमार्ग तुडुंब भरून येथील वाहतूक दोन तास ठप्प झाली हाती. वाहनधारकांसह पादचाऱ्यांचे हाल झाले. बीडबायपासच्या सातारा, देवळाईसह लगतच्या वस्त्या आणि शिवाजीनगरला जाणारा हा अरुंद रस्ता बंद पडला. परिणामी पुन्हा संग्रामनगर उड्डाणपूलावरून वाहनांना भर पावसातून मार्ग काढावा लागल्यान या भागातील वाहतूक व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला.

✔ **बॉक्स : ७९.४ मि. मी. नोंद :** रविवारी शहरासह जिल्ह्यातही जोरदार पाऊस झाला. जिल्हाभर दिवसभर ढगाळ वातावरण होते. तर दुपारी दीड ते दोनच्या सुमारास अर्धा तास मुसळधार पावसाने हजेरी दिली. शहर परिसरात सर्वत्र अकल्पित अचानक आलेल्या अवकाळी पावसाने हाहाकार उडाला. अनेक भागांत पाणी साचले, वाहनधारकांची तारांबळ उडाली. तर ग्रामीण भागात पावसाचे प्रमाण साधारण होते. चिकलठाणा वेधशाळेने रविवारच्या पावसाची नोंद ७९.४ मि. मी. एवढी केली आहे.

✔ **कामाबाबत संशय, तीव्र प्रतिक्रिया :** शिवाजीनगर भुयारी मार्ग आणि बीड बायपास देवळाई रोडचे काम एकाच ठेकेदाराला देण्यात आले होते. श्रेय घेण्यासाठी सगळे राजकारणी पुढे आले. पण भुयारी मार्गच चुकीचा बनविण्यात आला. पाणी जाण्यासाठी व्यवस्थित मार्ग काढण्यात आला नाही, असे सातारा-देवळांचे कायकर्ते सोमनाथ शिराणे यांनी सांगितले.





# 'काम, क्रोध, मत्सर, लोभ' वर मात करण्यासाठी नामसाधना गरजेची : समाधान महाराज शर्मा

**तभा वृत्तसेवा,**
**गंगापूर, दि. १९ मे-**

मनुष्य जीवनात काम, क्रोध, मत्सर, लोभ यांच्यावर मात करण्यासाठी नामसाधना गरजेची असल्याचे प्रतिपादन कथाकार समाधान महाराज शर्मा यांनी गंगापूर येथील शिवमहापुराण कथेत व्यक्त केले.

पाचव्या दिवसाची शिवमहापुराण कथा सुरू होण्यापूर्वी गंगापूर शहरात जोरदार पावसाची सुरूवात होउनही भाविकांनी हजारोच्या संख्येत भिजत येउन् कथेला हजेरी लावली. यावेळी जिजाउ फाउंडेशनच्या अध्यक्ष सुवर्णाताई जाधव, आयोजक संजय जाधव, रामेश्वर मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. समाधान महाराज पुढे म्हणाले की, लहान मुले ही तुमच्या व देशाचे उद्याचे भविष्य आहे त्यामुळे त्यांना चांगले संस्कार द्या, मोबाईलला पासवर्ड देउ नका जे पासवर्ड ठेवतात त्यांच्या मनात पाप असते. शर्मा महाराज पुढे म्हणाले की, विपरित परिस्थितीचा अनुभव आल्याशिवाय प्रगतीचा मार्ग सापडत नाही, जीवनात वनवास आला तरच जीवनात सुवास येतो, आपले राहणीमान साधे ठेवा, श्रीमंतीचे प्रदर्शन करणे चुकीचे आहे. यावेळी लक्ष्मण कदम, दिपक कदम, गोपाळसेठ राउत यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संतोष अंबिलवादे, कृष्णा पाटील, रामेश्वर नावंदर, सुरेश नेमाडे,योगेश पाटील मुकुंद जोशी, सोपान देशमुख,विशाल दारूंटे, अनिल जाधव,गोपाळ राऊत, बाबासाहेब लगड, यांच्यासह हजारो भाविकांची उपस्थिती होती.

# १६ वर्षानंतर भेटले दहावीतील गुरु-शिष्य

**तभा वृत्तसेवा,**
**बिडकीन, दि. १९ मे-**

बिडकीन येथील भगवती विद्यालयातील सन २००८ ते २००९ साली दहावीत शिक्षण घेणारे गुरुशिष्य तब्बल १६ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आले. नुकताच या वर्गमित्र-मैत्रिणी व शिक्षकांचा स्नेह मेळावा भगवती विद्यालयात मोठ्या थाटामाटात पार पडला. सर्व वर्गमित्र एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. याप्रसंगी जुने मित्र भेटल्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.



या स्नेह मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. लक्ष्मन धनवे, शिक्षक एकनाथ राशींनकर मुख्याध्यापक, दादासाहेब मिसाळ, रामनाथ धनवे, कमलाकर काळे, खुशाल चव्हाण, रायभान रक्ते, श्रीधर जऱ्हाड, अप्पासाहेब किसवे, इनामे या शिक्षकांची उपस्थिती होती. दहावीचे शिक्षण संपल्यानंतर पुढील शिक्षणासाठी वर्गमित्र एकमेकांपासून दुरावली होती. व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून एकमेकांशी पुन्हा जोडल्या गेल्यानंतर, प्रत्यक्ष भेटीची ऊत्कंठा सर्वांची जागृत झाली. सर्वांनी भेटण्याचे ठरवले व त्यानुसार गणेश काळे यांनी पुढाकार घेतला त्यांना वर्गमित्र दिनेश तापकीर, वसंत धर्मे, इसाक शेख, विकास हाटकर, वर्षा खोतकर, वंदना मोटकर यांचे सहकार्य लाभले. रविवारी रोजी भगवती विद्यालयात या वर्गमित्रांच्या पुढाकारातून शाळेचा घंटा वाजवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून शाळा भरवली. काही वर्गमित्राच्या पुढारातुन सर्वजण पुन्हा एकत्र येत शालेय जीवनात पुन्हा एक दिवसासाठी का होईना रममाण झाले. दरम्यान झालेल्या भेटीत सर्वांनी पुर्वीच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्षेत्रात वावरत असताना कामाच्या व्यापात एखाद्या वर्गमित्राची क्वचितच भेट व्हायची. मात्र तब्बल १६ वर्षांनंतर हा योग पुन्हा जुळून आल्याने वर्गमित्राबरोबर ज्यांच्या छत्रछायेखाली, मार्गदर्शनाखाली घडलो असे गुरुजण यांच्या भेटीचा प्रसंग मनाला वेगळाच आनंद व अनुभव देऊन गेल्याचा क्षण सर्वांनी अनुभवला. या दरम्यान एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेत निरोप घेतला.

# माजी सैनिकांचा सन्मान; आमखेडा, सोयगाव शहरातही तिरंगा रॅलीस मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोयगाव, दि. १९ मे-**

भारतीय सैनिकांचे मनोबल उंचावण्यासाठी सोमवार रोजी आमखेडासह सोयगाव शहरात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.ही तिरंगा यात्रा श्री.विठ्ठल मंदिरा पासून सुरू होऊन आमखेडा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून वाल्मिक नगर,छत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानक मार्ग श्री.विठ्ठल मंदिर येथे संपन्न झाली. यावेळी माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक संजय पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन राहुल राठोड यांनी केले.




या तिरंगा यात्रेत माजी सैनिक गणेश जावळे, शशीकांत काळे, सिताराम पाटील सहभागी झाले होते तसेच त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सैनिक सिताराम पाटील, पुष्पा काळे यांनी मनोगत व्यक्त केले. या पदयात्रेत सुरेश बनकर,ज्ञानेश्वर मोठे, पुष्पा काळे, जयप्रकाश चोव्हाण, संजय पाटील, बद्री राठोड, वसंत बनकर, योगेश पाटील, सुनिल गव्हाडे, राहुल राठोड, सुनील ठोंबरे, मयुर मनगटे,दिपक पाटील, मोतीलाल वाघ, दिलीप पाटील, विशाल गिरी, संजीवन सोनावणे, राहुल गिरी, संजय चौधरी, संजय मंडवे, दगडू आस्वार, संजय तायडे, मानस झंवर, अनिस तडवी, आनंदा इंगळे, वंदना पाटील, नंदा आगे, निलिमा पवार, लक्ष्मीबाई पाटील, ईश्वर शिरसागार, बाळू पाटील, संजय आगे,अरुण सोहनी, संजय तायडे, निलेश नागपुरे, किरण पाटील, गजानन शिरसाठ आदी नागरिक सहभागी झाले होते.

# मोरेवाडीत विठ्ठल रुक्मिणी मंदिरावर वीज कोसळली

**तभा वृत्तसेवा,**
**अंबाजोगाई, दि. १९ मे-**

अंबाजोगाईशहरासहतालुक्यात ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाने काल आणि आज दिनांक १९ मे सोमवार रोजी सायंकाळी थैमान घातले. असून, अचानक पडलेल्या या पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, मुसळधार पावसामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला असून मोरेवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरावर वीज पडून मंदिराचे अंशतः नुकसान झालेले आहे जीवितहनी झालेली नाही. अंबाजोगाई शहरासह तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून उष्णतेची तीव्र लाट पसरली आहे.



गेल्या आठवड्यात पारा ३९ अंशाच्या वर गेला होता. उन्हामुळे शहरातील नागरिक दुपारी घरीच राहणे पसंत करीत होते. परंतू आज दुपारी मोठ्या प्रमाणात गर्मी होत असल्याने पाऊस येणार असे वाटत होते आणि झालेही तसे. सायंकाळी अवकाळी पावसाने शहरासह तालुक्यात हजेरी लावली. यामुळे काही काळ जनजीवन विस्कळीत झाले. विजांचा कडकडाट आणि मुसळधार पाऊस यामुळे काही काळ उकाड्यापासून सुटका मिळाली असली तरी परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याची माहिती समोर आली. मोरेवाडीतील विठ्ठल रुक्मिणी मंदिरावर वीज पडून मंदिराचे अवश्यतः नुकसान झाले असून कुठल्याही प्रकारची जीवित हानी झाली नसल्याचे बोलले जात आहे.

# उघड्यावरील मांस खाल्याने महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**पैठण, दि. १९ मे-**

पैठण शहरातील वीट भट्टीवर मजुरी काम करणाऱ्या मजुरांनी उघड्यावरील मासे चिकन खाल्लयाने विषबाधा झाल्याची घटना घडली असून. यामध्ये एक महिलेचा मृत्य तर २० जण बाधित झाल्याने त्यांच्यावर पैठण येथे शासकीय व खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे.

या घटनेत मृत्यू झालेल्या मजूर महिलेचे नाव ललिता प्रेमलाल पालविया वय ३३ वर्ष रा.घर नं१२ चक्की बडा मोहल्ला टि.सी जमधड जिल्हा खंडवा मध्य प्रदेश असे आहे.

अधिक माहिती अशी की पैठण शहरालगत असलेल्या वीट भट्टीवर मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय महिला पुरुष कामगार असून. या मजुरांनी आठवडे बाजारातून नेहमीप्रमाणे मासे, चिकन अंडे खरेदी करून भाजी तयार करण्यात आली होती. काही भाजी उरल्याने या मजुरांनी शिळी भाजी खाल्लयामुळे रविवारी रोजी अचानक मळमळ, उलटी चक्रा येणे असा विषबाधा झाल्याचा त्रास सुरू झाल्यामुळे. वीट भट्टीवरील व परिसरातील मजुरांमध्ये एकच खळबळ उडवून भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकारामुळे बाधित झालेल्या मजुराला वीट भट्टी मालकांनी तातडीने उपचारासाठी पैठण शहरातील शासकीय रुग्णालयासह खाजगी रुग्णालयात दाखल केले. या घटनेमध्ये ललिता प्रेमलाल पालविया या महिला मजुराचा मृत्यू झाला. तर इतर बाधित मजुरांना शासकीय रुग्णालयासह खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सध्या या मजुरांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिले असून. यासंदर्भात पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी घटनेची नोंद करून पुढील तपास सफौ सुधीर ओव्हळ हे करीत आहे.

### विषबाधा झालेल्या मजूर रुग्णावर उपचार सुरू; बाधित झालेल्या मजूर रुग्णाचे नाव

गंगा किशोर ठाकरे वय २४ वर्षे गाव दोमालिया उत्तर प्रदेश, मंगल भुरीया ठाकरे वय ४४ वर्षे, सुखराई मंगल ठाकरे वय ४२ वर्ष, सीमा मंगल ठाकरे वय १७ वर्ष, दीपक मंगल ठाकरे वय १५ वर्ष, संजय मंगल ठाकरे वय १२ वर्ष, विमलाबाई बाबुलाल गौतम वय ३८वर्ष राहणार दुधकुडिया, संगीता बाबूलाल गौतम वय १८वर्ष, सलिता बाबुलाल गौतम वय १९वर्ष, फुलबती राजकुमार ठाकरे रा. दोमालिया, शिवांगी प्रेम पालवी वय ७ वर्ष, राजपाल बाबूलाल गौतमवय ११ वर्ष, राज बाबूलाल गौतम वय १४ वर्ष यासह काही रुग्ण वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरू आहे.

# पडद्याच्या पलीकडे एका निरोगी जीवनशैलीकडे

**तभा वृत्तसेवा**

सोनी सबवरील लोकप्रिय कलाकार- नवीन पंडिता, परिवा प्रणती, माहिर पांधी, आदित्य रेडिज आणि आरव चौधरी आपापले फिटनेस मंत्र सांगत आहेत आणि आपल्या गडबडीच्या वेळापत्रकात देखील ते चांगल्या आरोग्याचे संतुलन कसे साधतात याविषयी बोलत आहेत.

या कलाकारांसाठी, फिटनेस केवळ दिसण्यापुरता नसतो, तर त्यात मानसिक लवचिकता, भावनिक स्थैर्य आणि शारीरिक हालचाली या साऱ्याचा समावेश असतो. दररोजचा व्यायाम, आहाराच्या चांगल्या सवयी, ध्यान आणि सकारात्मक वृत्ती यांच्या बळावर या प्रत्येकाने एक आगळा वेलनेस दिनक्रम स्वतःसाठी आखून घेतला आहे, जो त्यांना सेटवर आणि त्यानंतर देखील ऊर्जावान ठेवतो. अशा निरोगी, आनंदी जीवनशैलीसाठी त्यांना कोणत्या गोष्टी प्रेरित करतात, याबद्दल त्यांच्याकडूनच ऐकू या.

## अग्रलेख...

# आता मुत्सद्देगिरीने पाकिस्तानची कोंडी

पहलगाम येथील बैसरण खोऱ्यात पर्यटकांवर हल्ला करून त्यांचे जीव घेण्याचे अमानुष कृत्य करून आपण फार मोठी चूक केली हे आता पाकिस्तानच्या ध्यानात आले आहे. या सर्व घडामोडींमागे एकच व्यक्ती असल्याचे मानले जात आहे आणि ती म्हणजे पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर होय. हा मतप्रवाह केवळ भारतातच नव्हे तर खुद्द पाकिस्तानातही वाहतो आहे. पहलगाम घटनेच्या सहा दिवसांपूर्वी मुनीर यांनी इस्लामाबादमध्ये अनिवासी पाकिस्तानी नागरिकांना संबोधित करताना द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचे गोडवे गायले. भाषणाला प्रामुख्याने बडे राजकीय नेते, ज्येष्ठ पत्रकार आणि लष्करातील आजी-माजी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. १६ एप्रिलला मुनीर यांनी केवळ भारताविरोधात गरळ ओकली नाही तर हिंदू धर्माला लक्ष्य केले. आपला धर्म, विचार, परंपरा आणि संस्कृती हिंदूंपेक्षा भिन्न असल्यानेच पाकिस्तानची निर्मिती झाली आहे. कलमाच्या आधारावर जगात फक्त दोनच रियासती निर्माण झाल्या आहेत आणि त्या म्हणजे मदिना आणि पाकिस्तान. त्यामुळे आपल्या पूर्वजांनी पाकिस्तान निर्मितीसाठी मोठा त्याग केला असून येणाऱ्या पिढ्यांना पाकिस्तान निर्मितीच्या कथा सांगणे आपल्या सर्वांचे परम कर्तव्य असल्याचे मुनीर तावातावाने सांगत होते. ऐकणारेही आपण काय श्रवण करीत आहोत याचे थोडेही भान न ठेवता मुनीर यांच्या प्रत्येक भारत आणि हिंदुविरोधी वक्तव्यांवर टाळ्या पिटत होते. जणू एखादा मौलवीच प्रवचन देत आहे. त्यांच्या प्रत्येक वाक्यात नुसता हिंदूविरोधी विखार आणि जळफळाट होता. चार-पाच दिवस पाकिस्तानात मुनीर जणू हीरो झाले होते. सोशल मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडियात त्यांचे भाषण फिरत होते. आणि त्यांच्या भाषणानंतर सहाच दिवसांनी पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला चढविला. धर्म विचारून केवळ हिंदू पर्यटकांना गोळ्या घातल्या. परंतु, जनरल आसिम मुनीर आणि त्यांचे प्यादे दहशतवादी हे विसरले की त्यांनी बिळात हात घातला आहे. दिल्लीत असलेल्या शक्तिशाली सरकारला डिवचण्याची मोठी चूक मुनीर यांनी केली हे त्यांना ६ मे रोजी पहाटे लक्षात आले. यावेळीही एखादे उरी किंवा बालाकोट होईल आणि आपल्यालाही शक्ती आजमावण्याची संधी मिळेल, असे पाकिस्तानला वाटले असावे. पण, भारतीय लढाऊ विमाने १०० किलोमीटर आतमध्ये घुसून हवाईतळ नष्ट करतील, याची कल्पनाही त्या देशाने केली नसेल. गेल्या दोन अडीच दशकांपासून ज्या लष्कर-ए-तैयबाचा प्रमुख हाफिज सईद आणि जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मौलाना मसूद अजहर यांना पाकिस्तान पोसत होते त्यांच्या बिळातच क्षेपणास्त्रे घुसविण्याची कामगिरी भारताच्या हवाई दलाने केली. मशिदीच्या आड मसूद अजहर आणि हाफिज दहशतवाद्यांचे अड्डे चालवित होते. पण हे अड्डेच नष्ट करण्यात आले. पाण्याचा लोंढा बिळात घुसावा आणि भीतीने बिळातून उंदीर सैरावैरा पळावेत, अशी दहशतवाद्यांची स्थिती झाली होती. पंजाबातील बहावलपूर हा मसूदचा अड्डा तर सीमेपासून शंभर किलोमीटर आत होता. भारतीय विमाने आणि क्षेपणास्त्रे इथपर्यंत येतील, याची कल्पनाही पाकिस्तानी लष्कराने केली नसावी. पण, सत्तेवर जर कणखर आणि पोलादी इच्छाशक्तीचे नेतृत्व असेल तर बहावलपूर असो की मुरिदके, दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून मारण्याची हिंमत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवून दिले आहे. पुलवामा येथील घटनेनंतर भारताने नियंत्रण रेषा पार करीत पाकिस्तानातील बालाकोटवर चढाई केली. त्यावेळीही ३०० च्या आसपास दहशतवादी ठार झाले होते. पण, भारताने केवळ दहा-वीस झाडे पाडली, असे सांगत भारतीय हवाई दलाची खिल्ली उडविली होती. त्यावेळी भारताकडे केवळ सॅटेलाईटच्या माध्यमातून उपलब्ध झालेले पुरावे होते. पण, पाकिस्तानला आणि भारतातील विरोधी गट इंडिया आघाडीला ठोस पुरावे हवे होते. आता पुरावे दाखविण्याची भानगडच ठेवली नाही. सर्व काही लाईव्ह होते. सहा ते दहा मे च्या पहाटेपर्यंत पश्चिमेच्या आकाशात जी दिवाळी सुरू होती ती याची देही याची डोळा पाहिल्याने आता पुरावे मागण्याची सोयच उरली नाही.

पहलगाम घटनेनंतर भारताने पाकिस्तानविरोधात लष्करी उपाययोजना तर केल्याच पण आंतरराष्ट्रीय मंचावर शेजाऱ्याला उघडे-नागडे करण्याचे धोरणही स्वीकारले. पहलगामनंतर पाकिस्तानने हवाई तळे, दोन-चार विमाने, शेकड्यांनी ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रे तर गमावलीच पण सोबत सिंधू आणि तिच्या उपनद्यांचे हिमालयातून वाहत येणारे शुद्ध, शीतल आणि गोड पाणीही गमावले. जगात अब्रू गमावली ती वेगळीच. पण, ज्या दहशतवादाच्या बळावर गेल्या तीन दशकांपासून भारताला रक्तबंबाळ करण्याचे काम पाकिस्तान करीत आहे तो पाकड्यांचा दहशतवादच जगासमोर मांडण्याचा निर्धार मोदी सरकारने केला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर अवघा भारत राजकीयदृष्ट्या एकवटला. सरकारच्या पाकिस्तानविरोधातील प्रत्येक कारवाईला पाठिंबाही दिला. एवढेच नव्हे तर आता पाकिस्तानवर थेट लष्करी कारवाई करा, असा सल्लाही काँग्रेस आणि त्यांचे सहकारी पक्ष देऊ लागले. पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्या दिवसापासूनच प्रत्येक निर्णय आणि घडामोडींची माहिती विरोधी पक्षांना देत होते. लोकशाही प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक असलेल्या विरोधकांनाही निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले. त्याचाच एक भाग म्हणून जागतिक पातळीवर पाकिस्तानचा दहशतवाद चव्हाट्यावर आणण्यासाठी आणि ऑपरेशन सिंदूर किती आवश्यक होते हे जागतिक समुदायांच्या लक्षात आणून देण्यासाठी नेत्यांची सात शिष्टमंडळे विविध देशांमध्ये पाठविण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या सातही शिष्टमंडळाचे नेतृत्व सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील खासदारांकडे देण्यात आले आहे. देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडतेला जेव्हा धोका निर्माण होतो तेव्हा सर्व राजकीय पक्ष एका सुरात बोलतात आणि हेच आपल्या लोकशाही व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. यापूर्वीही असे प्रसंग आले आहेत. १९९४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली जिनेव्हा येथे शिष्टमंडळ पाठविले होते. जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सलमान खुर्शिद यांचा शिष्टमंडळात समावेश होता. मुंबईत १९९३ मध्ये झालेल्या मुंबई साखळी बॉम्बस्फोटात पाकिस्तानच्या सहभागाचे पुरावे घेऊन वाजपेयींच्या नेतृत्वात शिष्टमंडळ गेले होते. भारताच्या या दाव्याचा विरोध म्हणून पाकिस्तानने युनोच्या मानवी हक्क आयोगात एक ठराव आणला होता ज्यात भारत जम्मू-काश्मिरात मानवी हक्कांचे उल्लंघन करीत असल्याचा आरोप केला होता. अटलबिहारी वाजपेयी यांनी युनोत जोरदार युक्तिवाद करीत भारताची बाजू अतिशय प्रभावीपणे मांडली. परिणामी पाकिस्तानने मांडलेला ठराव साफ फेटाळला गेला. आताही जवळपास अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. दहशतवादाचा पाठीराखा असलेल्या पाकिस्तानमुळे दक्षिण आशियात अशांतता निर्माण झाली आहे. शेजारी देशात आजही भारताला हवे असलेले दहशतवादी उघडपणे वावरत आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी पाकिस्तान सरकार आणि लष्कर त्यांचे संरक्षण करण्यात गुंतलेले आहे, हे उघड करण्याची जबाबदारी या सात शिष्टमंडळांवर सोपविण्यात आलेली आहे. पाकिस्तानात फोफावत असलेला दहशतवाद हा केवळ क्षेत्रीय नव्हे तर जागतिक मुद्दा आहे. पाकिस्तान लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद, अल-कायदा, हक्कानी नेटवर्कला पाठीशी घालणारा पाकिस्तान हा केवळ भारतातीलच नव्हे तर अमेरिका, इंग्लंड, अफगाणिस्तान आदी देशांमधील दहशतवादी कारवायांमध्येही पाकिस्तानचाच हात असल्याचे जगाला दाखविले जाणार आहे. मतमतांतरे असली तरी देशावर जेव्हा संकटाचे ढग जमू लागतात तेव्हा सर्व राजकीय पक्ष आपसातील मतभेत विसरून एकत्र येतात आणि भारतातील लोकशाही तंत्र सशक्त असल्याचा संदेशही जगाला दिला जाईल, हा इतिहास आहे व वर्तमानातही तसाच संदेश भारतीय शिष्टमंडळे देतील यात काहीच शंका नाही. पहलगाम हल्ल्यानंतर जगाला भारताची लष्करी शक्ती तर दिसून आलीच पण राजनैतिक पातळीवरही भारत तेवढ्याच सशक्तपणे मार्गक्रमण करीत असल्याचे सिद्ध होणार आहे. ▮

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# पाकिस्तान चीनचा मुखवटा!

पाकिस्तान भारतीय लष्कराचा मुकाबला करू शकत नाही. यावर 'उपाय' म्हणून त्याने दहशतवादी संघटना निर्माण केल्या आणि आता भारतीय लष्कराचा सामना करण्याची वेळ येताच त्याने चीनचा 'आश्रय' घेतला. भारत- पाकिस्तान यांच्यातील चार दिवसांच्या चकमकीची ही निष्पत्ती आहे.

**सर्वांत महत्त्वाचे दृश्य :** भारत-पाकिस्तान यांच्यात चार दिवस झालेल्या चकमकीचे सर्वांत महत्त्वाचे दृश्य कोणते असावे? चिनी आणि पाकिस्तानी सैनिक एकत्र नृत्य करीत आहेत हे ते दृश्य होते. पहलगाममध्ये आलेले दहशतवादी फक्त चार-पाच होते. पण, त्यांना प्रशिक्षण देण्यापासून, शस्त्रास्त्रे देत भारतात पाठविण्याचे काम आयएसआय म्हणजे पाकिस्तान लष्कराच्या गुप्तचर विभागाचे होते. हे दहशतवादी तर फक्त मुखवटा होते. आता पाकिस्तानही फक्त मुखवटा झाला आहे. चीनचा मुखवटा!

**५० हजार कोटी! :** पाच बिलियन डॉलर्स! म्हणजे जवळपास ५०,००० कोटी रुपये! भारत-पाकिस्तान यांच्यात चार दिवस झालेल्या चकमकीची ही किंमत असल्याचे सांगितले जाते. यात दोन्ही देशांनी केलेल्या शस्त्रास्त्रांचा वापर, त्यांची किंमत, दोन्ही देशांचे झालेले नुकसान यांचा यात समावेश आहे. पण, जेव्हा देशाच्या सुरक्षेचा प्रश्न येतो, तेव्हा कोणतीही किंमत ही कमीच मानली पाहिजे. काही आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी हा अंदाज वर्तविला आहे तर काहींच्या मते हा आकडा एक लाख कोटी रुपये एवढा असू शकतो. दोन्ही देशांनी शस्त्रविरामची घोषणा केली असली तरी दोन्ही देश युद्धाची सज्जता ठेवणार आहेत. किंबहुना ती वाढविणार आहेत. भारताने आपली युद्धसज्जता वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. यात लढाऊ विमानांची तैनाती, रणगाडे- सैन्याची तैनाती याशिवाय नौदलाची सज्जता यांचा समावेश आहे. म्हणजे शस्त्रविराम झाला असला तरी दोन्ही देशांचा लष्करी खर्च वाढणार आहे.

**चीन आता उघडपणे :** भारत-पाकिस्तान शस्त्रविराम होण्यापूर्वी चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी केलेले विधान सर्वांत बोलके होते. 'पाकिस्तानचे सार्वभौमत्व, त्याच्या सीमांचे रक्षण, त्याचे अखंडत्व यासाठी चीन बांधील आहे' असे चीनने घोषित केले. चीन पाकिस्तानला किती आणि कसा पाठिंबा देत आहे यापेक्षा अधिक कोणता पुरावा हवा?

**विमाने-शस्त्रास्त्रे :** चीन पाकिस्तानला लढाऊ विमाने पुरवीत आहे. जेएफएफ थंडर या चिनी बनावटीच्या विमानांचे उत्पादनच मुळी पाकिस्तानात सुरू आहे. चीनने पाकिस्तानला तोफा पुरविल्या आहेत. या तोफांमध्ये वापरले जाणारे तोफगोळे चीन पुरवीत आहे. चीनने पाकिस्तानात लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. 'चायना- पाकिस्तान एकॉनॉमिक कॉरिडॉर' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पात चीनने अनेक पायाभूत प्रकल्प उभारले आहेत, तो उभारीत आहे. व्याप्त काश्मीरचा काही भाग पाकिस्तानने यापूर्वीच चीनला दिला आहे. या भागातही चीनने पायाभूत प्रकल्प उभारले आहेत.

**आता सैनिकही... :** भारत-पाकिस्तान चकमकीत घडलेली नवी घटना म्हणजे चिनी सैनिकही पाकिस्तानात दाखल झाले आहेत. या सैनिकांची संख्या किती होती हे सांगणे आज तरी शक्य नाही. पण, चीनचे सैनिक पाकिस्तानात दाखल झाले आहेत ही या चकमकीची सर्वांत मोठी घटना होती.

**सायबर हल्ला! :** चीनने संगणक हॅकिंगच्या बाबतीत अमेरिकेला केव्हाच मागे टाकले आहे. अशा या चीनने भारत-पाकिस्तानच्या ताज्या चकमकीत पाकिस्तानला आणखी एक मोलाची मदत केली. भारताने पाकिस्तानी हवाई दळाची दळणवळण यंत्रणा ठप्प करण्यात यश मिळविले असतानाच, पाकिस्तानाने भारतावर अचानक सायबर हल्ला चढविला. काही भागांत पाकिस्तानला यश मिळाले, काही ठिकाणी त्याला ते करता आले नाही. हे करण्याचे तंत्रज्ञान पाकिस्तानजवळ नाही. हे सारे चिनी तज्ज्ञांनी घडवून आणले आहे. व्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानने आपल्या दहशतवाद्यांचे संभाषण गोपनीय ठेवण्यासाठी जी काही यंत्रणा उभारली आहे, ती चीनच्या साहाय्याने उभारली आहे असे म्हटले जात होते.

**पैशाचा ओघ :** पाकिस्तान कंगाल आहे ही वस्तुस्थिती आहे. भारत-पाकिस्तान चकमक सुरू असताना आंतरराष्ट्रीय नाणे निधीने त्याला जवळपास १० हजार कोटी रुपयांचा कर्जाचा हप्ता दिला. भारताने यास विरोध केला होता. पण, भारताचा विरोध डावलून हा निर्णय घेण्यात आला. ही अमेरिकेची कृपा होती काय असे आता विचारले जात आहे. अमेरिकेच्या संमतीशिवाय आंतराष्ट्रीय नाणे निधी असा निर्णय घेणे शक्य नव्हते. विशेष म्हणजे भारत- पाकिस्तान यांच्यात चकमक सुरू असताना ९ मे रोजी हा निर्णय घेण्यात आला. आंतरराष्ट्रीय नाणे निधीला तो कमीतकमी पुढे तरी ढलकता आला असता. पण, अगदी तातडीने हे कर्ज मंजूर करून ते पाकिस्तानला देण्यात आले. यामागे अमेरिकेचा हात असावा काय अशी एक शंका व्यक्त केली जात होती. नंतरच्या घटनाक्रमाने त्यावर जणू शिक्कामोर्तब केले आहे.

**ट्रम्प यांची भूमिका :** भारत आणि पाकिस्तानची तुलना होऊ शकत नाही. पण, राष्ट्रपती ट्रम्प यांनी भारत पाकिस्तानला जणू एकाच पारड्यात टाकले आहे. दोन्ही देशांचा त्यांनी गौरव केला आहे. पाकिस्तान हा एक दहशतवादी देश. ट्रम्प यांनी त्याचे कौतुक करावे? हा साराच घटनाक्रम अनाकलनीय असा झाला आहे.

**चित्र सुस्पष्ट :** भारत- पाकिस्तान चकमकीने एक बाब पुन्हा स्पष्ट केली आहे. त्याचा विचार भारताला करावा लागेल. भारतीय लष्कराशी आपण टक्कर घेऊ शकत नाही याची पाकिस्तानला कल्पना असल्याने त्यांनी लष्कर-ए-तयबा, हिजबुल यासारख्या दहशतवादी संघटना स्थापन केल्या. आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना या संघटनांकडे जणू 'प्रतिनियुक्ती'वर पाठविले. या संघटना भारतात दहशतवादी कारवाया घडवीत असतात. पाकिस्तानने कधीही अशा संघटनांना लगाम लावण्याचा प्रयत्न केला नाही. कारण त्या त्यांनीच स्थापन केल्या आहेत. आता भारताने पाकिस्तानवर हल्ला चढविला. मग, चीन पाकिस्तानच्या मदतीला धावला. पाकिस्तानने ज्याप्रमाणे दहशतवादी संघटना स्थापन केल्या, त्यांना प्रोत्साहन दिले. चीन- पाकिस्तान, बांगला देश, नेपाळ, भूतानला हाताशी धरून यापुढील युद्ध खेळणार आहे.

**लडाखनंतर :** भारताने काश्मीरचे कलम ३७० व लडाखचे कलम ३५ अ हटविल्यानंतर चीन-पाकिस्तान आणखी जवळ आले. त्या जवळिकीचा परिणाम या चार दिवसांच्या चकमकीत दिसला. येणाऱ्या काळात चीनने आपले नौदल कराचीजवळ आणून ठेवल्यास आश्चर्य वाटू नये. पाकिस्तानचे ग्वादर हे बंदर चीनने विकसित केले आहे. स्वाभाविकच त्याच्या सरंक्षणाची जबाबदारी त्याची राहणार आहे. येणाऱ्या काळात पाकिस्तान हा चिनी नौदलाचा एक अड्डा ठरणार हे चित्र स्पष्ट आहे. चीनने आपल्या नौदलाचा विकास करण्यासाठी फार मोठी गुंतवणूक केली आहे. जगावर वर्चस्व ठेवायचे असेल तर नौदल शक्तिशाली असले पाहिजे ही शिकवण त्याने अमेरिकेकडून घेतली आहे.

**प्रश्न अमेरिकेचा :** भारत- पाक चकमकीत चीनच्या सक्रिय सहभागाची भूमिका काहीशी धक्कादायक असली तरी अपेक्षित अशी आहे. प्रश्न आहे अमेरिकेचा. अमेरिकेने पाकिस्तानची बाजू का घ्यावी? पाकिस्तान हा दहशतवादी देश आहे. त्याने ओसामा बिन लादेनला आश्रय दिला होता. हे सारे माहीत असूनही राष्ट्रपती ट्रम्प यांनी पाकिस्तानसोबत व्यापार करण्याची घोषणा का करावी? ट्रम्प यांची कोणती मजबुरी होती? भारत-पाक यांच्यातील शस्त्रविरामाने हे सारे प्रश्न उपस्थित केले आहेत, जे सध्या तरी अनुत्तरित आहेत.

भारत-पाक सीमा सध्या शांत आहे. पण, शांतता म्हणजे काय? एका विचारवंताने म्हटले आहे, 'शांतता म्हणजे दोन युद्धांचा मध्यांतर'! ▮

## वेध

पुंडलिक आंबटकर

# विदर्भ होणार दुष्काळमुक्त!

विदर्भातील जवळपास ८० ते ८५ टक्के शेती जिरायती आहे. सरकारने मागेल त्याला विहीर ही योजना राबविल्याने सिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे. आता सरकारने वैनगंगा-नळगंगा हा नदीजोड प्रकल्प हाती घेऊन विदर्भाला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. राज्य सरकारने ६ ऑगस्ट २०२४ रोजी या प्रकल्पाची घोषणा केली. जवळपास ८८ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे विदर्भासह मराठवाड्यातील काही भागांत हरितक्रांती येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१८ मध्येच या प्रकल्पाचा प्रस्ताव मांडला होता. परंतु, २०१९ मध्ये सरकार बदलले आणि हा विषय धूळ खात पडून राहिला. जवळपास ५०० किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पामुळे पावणे चार लाख हेक्टर शेती सिंचनाखाली येणार आहे. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांचा विचार यात प्रामुख्याने करण्यात आला आहे. महाराष्ट्रात दरवर्षी जवळपास २२५.७ लाख हेक्टर क्षेत्रावर विविध पिकांची लागवड केली जाते. विदर्भात कापूस आणि सोयाबीन ही दोन मुख्य पिके घेतली जात असली तरी पूर्व विदर्भात धान हे प्रमुख पीक आहे. विदर्भात यंदा कापूस आणि सोयाबीन प्रत्येकी १४ लाख हेक्टर क्षेत्रात लागवडीचे नियोजन आहे. विदर्भात केवळ १६.४ टक्के इतकेच क्षेत्र बागायती आहे. सरकारने विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी हा प्रकल्प हाती घेतल्याने पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होतील. प्रकल्प ७ वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सध्या पश्चिम विदर्भात उन्हाळी तिळ काढणीला आला आहे. काही ठिकाणी खरेदी सुरू झाली आहे. परंतु, शेतकऱ्यांचा माल बाजारात येताच भाव पडले. यामागची कारणमीमांसा शोधून शासनाने शेतकऱ्यांना न्याय देणे गरजेचे आहे. वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प विदर्भातील ६ जिल्हे आणि १५ तालुक्यांसाठी वरदान ठरणार आहे. पावसाचा लहरीपणा आणि अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे पश्चिम विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. आता हा प्रकल्प शेतकऱ्यांना नवसंजीवनी देणारा ठरू शकतो. या प्रकल्पाच्या माध्यमातून पावसाळ्यात गोसेखुर्द धरणातील अतिरिक्त पाणी कृत्रिम नदीच्या माध्यमातून वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा आदी जिल्ह्यांमध्ये नेले जाणार आहे. या योजनेचा लाभ नागपूर जिल्ह्यातील काही तालुक्यांनासुद्धा होणार आहे. या प्रकल्पामुळे शेतकरी बारमाही पिके घेऊ शकतील. राज्यात कृष्णा, भीमा, गोदावरी, तापी, वर्धा, वैनगंगा या नद्यांच्या खोऱ्यात लहान-मोठे सिंचन प्रकल्प आहेत. राज्याची कमाल सिंचन क्षमता १२६ लाख हेक्टरपर्यंत नेण्याचा सरकारचा मानस आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प यादृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. हा प्रकल्प राज्याच्या इतिहासातील सर्वांत मोठा ठरणार असून, भंडारा जिल्ह्यापासून बुलढाणा जिल्ह्यापर्यंत ४२६.५४ किमी कालवे, बोगदे, बंदिस्त नाल्या, उपसा सिंचन व जलसाठे आदींचे जाळे विणून शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचविले जाणार आहे. दुसरीकडे शासनाने तापी महापुनर्भरण योजनेची घोषणा केली आहे. या प्रकल्पाचा लाभ उत्तर महाराष्ट्रासह पश्चिम विदर्भातील खारपाणपट्ट्यातील शेतकऱ्यांना होणार आहे. विदर्भात आजपर्यंत हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. या आत्महत्यांमागे सिंचनाचा अनुशेष हे प्रमुख कारण आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये म्हणून शासनाने अनेकदा कर्जमाफी दिली. परंतु, ही केवळ वरवरची मलमपट्टी ठरली. राज्य सरकारने ४१ लाख शेतकऱ्यांना ३४ हजार कोटींची कर्जमाफी दिली होती. तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होऊ शकल्या नाहीत. त्यापूर्वी शरद पवार केंद्रात कृषिमंत्री असताना ७२ हजार कोटींची कर्जमाफी केली. मात्र, यात मृतांच्या टाळूवरचे लोणी संबंधितांनी खाल्ल्याचा ठपका कॅगने ठेवल्याने मोठे वादळ उठले होते. त्यानंतर ठाकरे सरकारनेही कर्जमाफीचा प्रयत्न करून पाहिला. परंतु, कर्जमाफी हा काही शेतकऱ्यांच्या समस्यांवरील उपाय ठरू शकला नाही आणि ठरू शकतही नाही. त्यामुळे महायुती सरकारने आता समस्येच्या मुळालाच हात घातला आहे. सध्याच्या राज्य सरकारमधील मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा शेतीशी संबंध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना न्यायाची अपेक्षा आहे. विदर्भाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्र खूप संपन्न आहे. विदर्भात अनेक शेतकऱ्यांकडे १० ते १२ एकर शेती आहे. परंतु, तरीही त्यांचे उत्पादन आणि उत्पन्न कमी आहे. यामागे सिंचनाचा अनुशेष हे प्रमुख कारण आहे. आता या विषयाबाबत सरकारने गांभीर्य दाखविल्याने सुजलाम् सुफलाम विदर्भाची अपेक्षा करायला हरकत नाही. ▮



९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# भक्तिमार्गाचे पथप्रदर्शक संत चोखामेळा

एकदा संत नामदेव महाराजांचे कीर्तन सुरू होते. कीर्तनात बराच मोठा भक्त समुदाय जमला होता. नामदेव महाराजांनी ''सुखा लागी करिसी तळमळ, तरी तू पंढरीसी जाय एक वेळ'' हा अभंग घेतलेला होता. सर्व भक्त तल्लीनतेने त्यांचे हे कीर्तन ऐकत होते. यामध्ये एक जोडपे सुद्धा इतरांपेक्षा दुरून हे सर्व कीर्तन ऐकत होते. संत नामदेवांचे विचार ऐकून त्यांनाही खूप आनंद झाला. पाहता पाहता कीर्तन संपले. सर्व भाविक नामदेव महाराजांना नमस्कार करून जाऊ लागले. परंतु हे जोडपे मात्र समोर गेले नाही. त्यावेळेस नामदेव महाराजांचे लक्ष त्यांच्यावर गेले. नामदेव महाराजांनी त्यांना आपल्या जवळ बोलावले. त्यावेळेस त्या दोघांनी दुरूनच त्यांना जमिनीला हात लावून नमस्कार केला. हे पाहून नामदेव महाराज म्हणाले, ''अरे असे दुरून नमस्कार का करता? जवळ या. कोण तुम्ही? काय नाव तुमचे?'' त्यावेळेस ती व्यक्ती म्हणाली, ''माझे नाव चोखोबा. ही माझी पत्नी सोयराबाई. तुमचे कीर्तन ऐकून आम्ही धन्य झालो. आम्ही अस्पृश्य असल्याने समाजाने आम्हाला दूर लोटलेले आहे. म्हणून आम्ही तुम्हाला दुरून नमस्कार केलेला आहे.'' हे ऐकून संत नामदेव महाराज त्यांना म्हणाले, ''जो समाज तुमचा विटाळ पाळतो त्यांना अजून धर्म समजलेला नाही. तुम्ही माझ्याजवळ या आणि नमस्कार करा.'' त्यानंतर चोखोबा आणि त्यांच्या पत्नीने त्यांना वाकून नमस्कार केला. संत नामदेवांनी सुद्धा त्यांच्या डोक्यावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिला. त्यानंतर चोखोबा त्यांना म्हणाले की, ''महाराज, समाजाने आम्हाला दूर लोटले तरी तुमचा पांडुरंग आम्हाला जवळ करेल का?'' तर त्यावर संत नामदेव म्हणाले, ''निश्चितच करेल. त्याच्यासाठी तुम्ही आम्ही सर्व समान आहोत. यानंतर तुम्ही पांडुरंगाची भक्ती सोडू नका.'' त्यानंतर संत नामदेव हेच संत चोखामेळा यांचे गुरू झाले.

संत चोखामेळा यांचा जन्म विदर्भातील देऊळगाव राजा तालुक्यातील मेहुणपुरी या गावी सन १२७३ या वर्षी झाला होता. एका अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये त्यांचा जन्म झाला. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांना अस्पृश्यतेचे चटके बसले. आजपासून सातशे वर्षांपूर्वीचा समाज हा अनेक रूढी आणि कुरीतींमध्ये बांधला गेलेला होता. परंतु अशा समाजात जर जन्माला आलेली एखादी व्यक्ती नास्तिक झाली, तिने ईश्वराचे अस्तित्व नाकारले तर आपण तिला फारसा दोष देऊ शकत नाही. अशी हजारो उदाहरणे या समाजामध्ये आहे.

चोखा म्हणे पाहता पंढरी भू वैकुंठ, मनाचे हे कष्ट दूर झाले ॥

चोखोबांच्या जीवनाची दिशा आता ठरलेली होती. विठ्ठलाचे चरण हेच त्यांना पैलतीरावर नेणारे साधन होते. त्यांच्या जवळ लौकिक शिक्षण काहीही नव्हते. त्यामुळे वेदशास्त्र पुराण वाचणे हे तर त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे ते म्हणतात-

आम्हा न कळे ज्ञान, नकळे पुराण, वेदांचे वचन आम्हा न कळे ।

पांडुरंगाचे नामस्मरण हेच आमचे वेद आणि हेच आमचे पुराण अशी त्यांची श्रद्धा होती. ज्या पंढरपूरच्या विठोबाची, पांडुरंगाची चोखोबा भक्ती करीत होते त्याच्या दर्शनासाठी सुद्धा त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. तरीसुद्धा जसे जसे चोखोबांचे वैराग्य वाढू लागले, त्यांनी मंदिराच्या बाहेर बसूनच पांडुरंगाला आळवणे सुरू केले.

उंबरठ्यासी कैसे शिवू, आम्ही जाती हिन
रूप तुझे कैसे पाहू, त्यात आम्ही लीन
पायरीशी होऊ दंग गाऊनी अभंग ॥
नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग

हळूहळू त्यांची कीर्ती संपूर्ण वारकरी संप्रदायात झाली. लोकही त्यांना आदराने मान देऊ लागले.

अनेक वर्ष आषाढी कार्तिकीस चोखोबा, सोयराबाई आणि कर्ममेळा हे पंढरपुरास येत होते. परंतु त्यांना विठ्ठलाचे दर्शन घडत नव्हते. आता चोखोबांना विठ्ठलाच्या दर्शनाची आस लागलेली होती. त्यामुळे एके दिवशी पहाटे स्नान करून ते मंदिरात प्रवेश करते झाले. पुजारी कुठेतरी गेलेला आहे हे पाहून पांडुरंगाच्या दर्शनासाठी अधीर झालेले मन त्यांना सरळ विठ्ठलाच्या गाभाऱ्यात घेऊन गेले. इतके वर्ष ज्या विठ्ठलाची भक्ती केली त्याचे दर्शन त्यांना झाले आणि भाव वेगाने ते विठ्ठलाच्या चरणावर कोसळले. त्याच वेळेला असे म्हणतात की, विठ्ठलानी त्यांना दर्शन दिले. प्रत्यक्ष विठ्ठलाने आपल्या गळ्यातील वैजयंती माळ ही चोखोबांच्या गळ्यात घातली. चोखोबा भानावर आले व जसे गाभाऱ्यातून बाहेर येऊ लागले तसे काही लोकांना ते दिसले. एक तर चोखोबा गाभाऱ्यात गेले व गळ्यात पांडुरंगाच्या मूर्तीची वैजयंती माळ आहे हे पाहून लोक संतापले. त्यांनी चोखोबांना मार दिला व वैजयंती माळ चोरी केली म्हणून कोतवालास वर्दी दिली. कोतवाल आला त्याने चोखोबांना शिक्षा केली. चोखोबांना बैलांना बांधले गेले व बैलांना आसूड मारले गेले. जेणेकरून बैल पळतील व चोखोबांना फरफटत नेतील. परंतु बैलांवर आसूडाचे मार होत होते तरीपण बैल हलले नाही.

चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा, गाईन केशवा नाम तुझे ॥

चोखोबांच्या मनातील पांडुरंगाच्या दर्शनाची इच्छा आता पूर्ण झालेली होती. चोखोबांनी पंढरपुरातच एक छोटी झोपडी बांधली व तिथेच ते सोयराबाई व कर्ममेळा यांच्यासोबत राहू लागले. पुढे काही वर्षांनी चोखोबांचे शरीर थकत चालले होते. त्यांना असे वाटले की आपण मंगळवेढ्याला आपल्या गावी गेलो पाहिजे. त्यामुळे ते आपल्या परिवारासह मंगळवेढ्याला आले. त्यावेळेस मंगळवेढ्याला मुसलमानी अंमल सुरू झालेला होता. मुसलमान अंमलदाराला एक मोठी गढी बांधायची होती. त्यासाठी त्यांनी अनेक लोकांना काम करायला पकडून आणले होते. त्यामध्ये चोखोबांना सुद्धा नेले गेले. बांधकाम सुरू असताना मोठी भिंत खचली व त्यामध्ये १६-१७ जण गाडले गेले. चोखोबाचाही त्यामध्येच अंत झाला. त्यावेळेस नामदेव महाराज पंढरपूरला आले होते. प्रत्यक्ष विठ्ठलाने त्यांना दृष्टांत दिला की, माझा भक्त चोखामेळा याचा अवतार संपलेला आहे. तुम्ही मंगळवेढ्यात जाऊन त्याच्या अस्थी घेऊन या. त्याप्रमाणे नामदेव महाराज मंगळवेढ्यास गेले. परंतु गाडले गेलेल्या प्रेतांमध्ये चोखोबांचा देह कोणता हे कसे ओळखायचे हा प्रश्न त्यांना पडला होता. परंतु प्रत्येक प्रेत ज्यावेळेस ते बघू लागले त्यावेळेस एका प्रेतातून त्यांना ''विठ्ठल विठ्ठल विठ्ठल'' असा ध्वनी येत आहे असे त्यांच्या कानी आले. त्यावरून नामदेव महाराजांची खात्री पटली की हेच चोखोबा आहेत. चोखोबांच्या अस्थी पंढरपूरला आणून भीमा नदीमध्ये विसर्जित करण्यात आल्या व त्यातील काही अस्थी घेऊन चोखोबा मंदिराच्या बाहेर जिथे उभे राहून कीर्तन करायचे त्या ठिकाणी त्या ठेवून तेथेच एक समाधी बांधण्यात आली. आज तिथे एक मंदिर आहे. लाखो वारकरी पांडुरंगाचे दर्शन घेण्यापूर्वी त्यांच्या परमभक्ताचे चोखोबांचेही दर्शन घेतात. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## राजकारणात नेते सक्रिय, कार्यकर्ते निष्क्रिय

सध्याच्या राजकीय घडामोडींमध्ये एक स्पष्ट चित्र समोर येत आहे राजकीय पक्षातील नेतेमंडळी विविध स्तरांवर सक्रिय असून, कार्यकर्त्यांमध्ये मात्र निष्क्रियता जाणवत आहे. या विसंगतीमुळे पक्षाचे संघटनात्मक बळ कमजोर होत असल्याचे स्पष्ट होत आहे. नेते विविध कार्यक्रम, सभा, माध्यमांतील चर्चा, सोशल मीडिया यामार्फत जनतेमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहेत. परंतु हे सगळं वरच्या पातळीपुरतं मर्यादित असल्याचं चित्र आहे. स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते गोंधळलेल्या, नाराज अवस्थेत आहेत. कार्यकर्त्यांच्या मते, त्यांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेतले जात नाही. अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना दुर्लक्षित केलं जात असून, पक्षामध्ये केवळ गटबाजी, फोटोंची स्पर्धा आणि प्रसिद्धीपुरता सक्रियपणा उरला आहे, असा सूर अनेक कार्यकर्ताकडून ऐकण्यास मिळतो. यात राजकीय निरीक्षकांचे म्हणणे आहे की, कार्यकर्त्यांशिवाय पक्षाचं मूळ उद्ध्वस्त होतं. नेतृत्व चमकायला हवं, पण ते कार्यकर्त्यांच्या बळावरच शक्य होतं. सध्या ही कडी तुटताना दिसतेय, हे सगळ्याच राजकीय पक्षासाठी गंभीर संकेत आहेत.


सामाजिक पातळीवरील अनेक संघटना, मंडळं आणि मतदारही या परिस्थितीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहत आहेत. आगामी काळात ही दरी भरली गेली नाही तर राजकीय पक्षातील कार्यकर्ते आणि निवडणुकीत प्रत्यक्ष परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

● ● ● ●

## स्वातंत्र्यवीर सावरकरांची राष्ट्रनीती भारताच्या सुरक्षिततेची गुरुकिल्ली!

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आजच्या स्थितीत त्यांच्या राष्ट्राभिमानी विचारांची किती आवश्यकता आहे, हे थोडक्यात पाहू. त्यांची राष्ट्रहिताची भूमिका आजही तितकीच महत्त्वाची आहे जितकी त्याकाळी होती. त्यांचा सिद्धांत स्पष्ट होता ''जे राष्ट्रहिताचे ते तेच योग्य अन्य त्याज्य!'' स्वार्थ त्यांना मान्य नव्हता; त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू राष्ट्रसेवा हाच होती. ते फक्त विचारवंत नव्हते, तर कृतिशील राष्ट्रनायक होते.



आज देशावर सातत्याने दहशतवादी हल्ले होत आहेत. अशा वेळी हल्लेखोरांवर वर्षानुवर्षे खटले चालतात, पण शिक्षा होत नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सांगितले होते ''जो राष्ट्राच्या प्रगतीत अडथळा ठरेल तो शत्रूच.'' त्यांच्या विचारांची आजच्या काळात अधिकच आवश्यकता आहे. राष्ट्रहित हेच अंतिम मूल्य मानून कृती करणे आवश्यक आहे. सत्य-अहिंसेच्या अतिरेकाऐवजी 'शठास प्रतिशाठ्यम्' ही भूमिका आवश्यक आहे. पहलगामनंतरचा एअर स्ट्राईक याचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या विचारांचा स्वीकार करणे म्हणजे राष्ट्राची सुरक्षा अधिक प्रबळ करणे होय. एकूणच, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारसरणीचा अवलंब करणे आणि त्यांनी दाखवलेल्या सनातन राष्ट्रनिर्मितीचा मार्ग स्वीकारणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

● ● ● ●

## रेल्वे पोलिसांची कार्यतत्परता

जी.आर.पी. नागपूर रेल्वे स्टेशन यांच्या कर्तव्यतत्परतेचा सुखद अनुभव नुकताच आला. माझे काही नातेवाईक १६ मे रोजी अहमदाबादहून १२९४९ कविगुरू एक्सप्रेसने अकोल्याकरिता निघाले. १७ मे रोजी सकाळी अकोल्याला उतरले. मला साधारण १०.४५ वाजता त्यांचा फोन आला व म्हणाले की, त्यांची कपडे असलेली ब्राऊन रंगाची एअर बॅग रेल्वे डब्यातच विसरले. तरी नागपूरला मिळाली तर पाहा. त्या सुमारास गाडी खापरीहून निघाली होती व मला घरून निघून स्टेशनवर गाडी गाठता येऊ शकत नव्हती. म्हणून मी लगेच जी.आर.पी. नागपूर रेल्वे स्टेशनला फोन केला व सविस्तर माहिती दिली. साधारण ११.०० वाजता गाडी नागपूर स्टेशनवर आली व मला १० मिनिटांत जी. आर. पी. नागपूर यांचा फोन आला की बॅग सापडली व त्यांच्या कार्यालयात ओळख पटवून घेऊन जावी. ज्या मुलाची बॅग राहिली होती त्याचे वडील ती बॅग जी. आर. पी. नागपूर ठाण्यातून घेऊन गेले. मी जी. आर. पी. नागपूर यांचे आभार मानले. त्यांच्या कार्यतत्परतेचा असा सुखद अनुभव आला. ▮

**मिलिंद कृ. गोखले**/नागपूर

● ● ● ●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.


हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# शाश्वत शहरविकासासाठी पर्यावरणपूरक दृष्टिकोन ठेवावा-प्रतिभा भदाणे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शहराच्या वाढीबरोबरच समस्यादेखील वाढतात. त्यामुळे शहर लहान असताना व्हिजन डॉक्युमेंट तयार करून त्यात पर्यावरण रक्षण, पाण्याचा पुनर्वापर, जल पुनर्भरण, हरित क्षेत्रांचे जतन, ओपन स्पेसमध्ये वृक्षारोपण आणि सौर उर्जेसारख्या पर्यायांचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. जालनासारख्या शहरांसाठी ही संधी अधिक प्रभावीपणे साधता येऊ शकते, असे प्रतिपादन राज्याच्या नगरविकास संचालनालयाच्या संचालक प्रतिभा भदाणे यांनी केले.

जालना क्रेडाईच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळ्यानिमित्त रविवारी (ता. १८ मे) हॉटेल गॅलेक्सी येथे आयोजित ''शहरांचा शाश्वत विकास'' या विषयावरील विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र क्रेडाईचे उपाध्यक्ष सुनील कोतवाल आणि सहसचिव गंगाप्रसाद तोष्णीवाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



भदाणे म्हणाल्या की, सन १९९० मध्ये माझी पहिली पोस्टिंग जालना येथे झाली होती. त्या वेळीचे शहर आणि आजचे शहर यात मोठा फरक दिसतो. जालना सोन्याचा पाळणा' ही केवळ ओळख न राहता, र्यावरणपूरक दृष्टिकोन ठेवून ती जपली गेली पाहिजे. शासनाने विविध धोरणांतून शाश्वत शहरविकासाला चालना दिली आहे. बांधकाम व्यावसायिक हे शहरी विकासाचे शिल्पकार असून त्यांनी पर्यावरणपूरक साहित्य, ऊर्जा कार्यक्षम डिझाइन्स, जलसंधारण आणि पर्यावरण संतुलन यावर भर दिल्यास शहरे अधिक सुंदर व राहणीय बनतील. शहराच्या शाश्वत विकासासाठी प्रशासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. सुनील कोतवाल यांनी शहर विकासासाठी प्रशासन, क्रेडाई व विविध संस्थांनी परस्पर सहकार्याने काम करण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी जालना क्रेडाईतील अभयकुमार आबड, संजय मुथा, विजयकुमार बगडिया यांच्या योगदानाचा उल्लेख केला. गंगाप्रसाद तोष्णीवाल यांनी क्रेडाईची नवीन कार्यकारिणी चांगले कार्य करेल, असा विश्वास व्यक्त करून, महाराष्ट्र कार्यकारिणीचे मार्गदर्शन कायम राहील असे सांगितले. मावळते अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी आपल्या कार्यकाळातील उपक्रमांचा आढावा सादर केला. नूतन अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार यांनी मनोगतात सांगितले की, क्रेडाई ही फक्त बांधकाम व्यावसायिकांची संघटना नसून, हजारो लोकांना रोजगार देणारे एक मोठे छत्र आहे. या व्यवसायावर सुमारे २०० घटक अवलंबून आहेत. काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत व्यवसायिकांनी स्वतः ला अपग्रेड करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी पदग्रहण सोहळ्यातील डॉ. विठ्ठल पवार यांनी अध्यक्षपदाची सूत्रे मावळते अध्यक्ष अभय कुलकर्णी यांच्याकडून स्वीकारली. तसेच नूतन सचिव चेतन मराठे यांनी मावळते सचिव अविनाश भोसले यांच्याकडून पदभार स्वीकारला. यावेळी उभयतांसह सिद्धांत शर्मा, रितेश मंत्री, विष्णू पाटेकर, रवींद्र हुसे, दीपक आंभोरे, शरद बारगजे, केदार जाधव, शेखर जयस्वाल, वैभव बंब, अंशुल आबड यांच्यासह नूतन पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा करवा यांनी केले तर आभार प्रदर्शन रवींद्र हुशे यांनी केले. या कार्यक्रमाला शहरातील अनेक विकासप्रिय नागरिक, उद्योगपती, बांधकाम व्यावसायिक, व्यापारी, सीए, डॉक्टर्स, वकील आणि सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### खुशी मानधने सीबीएसई पॅटर्न दहावी परीक्षेत परभणी जिल्ह्यात सर्वप्रथम

**मंठा/ प्रतिनिधी**

मंठा येथील सुप्रसिद्ध डॉ. नितीन मानधने यांची मुलगी कु. खुशी नितीन मानधने हिने सीबीएसई पॅटर्न दहावी परीक्षेत ९९% गुण मिळवून परभणी जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. खुशी मानधने ही सेलू येथील श्रीराम प्रतिष्ठानच्या प्रिंस इंग्लिश शाळेमध्ये शिकत होती. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यासह मंठा येथे घरी येऊन तिचा सत्कार केला. या यशामागे आपल्या शाळेतील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व आई -वडिलांची प्रेरणा असून पुढील शिक्षणासाठी पुणे येथे जाणार असल्याचे कु. खुशीने सांगितले. तिला वैद्यकीय क्षेत्रातच आपले करिअर घडवायचे असल्याचे तिने यावेळी सांगितले. कु. खुशीला मिळालेल्या या यशाबद्दल शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यापारी व डॉक्टरांनी घरी जाऊन अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### विज पडून कोठाकोळी येथील दोन तरुण ठार एक जखमी

**तभा वृत्तसेवा**
**पारध / प्रतिनिधी**



शेतात काम करीत असताना विज कोसळुन दोघे जण जागीच ठार झाले तर एक जण जख्मी झाला असल्याची घटना भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई शिवारात घडली आहे.सदर घटनेत मृत झालेल्या तरुणांचे नाव गणेश प्रकाश जाधव(३५) सचिन विलास बावस्कर (२८) तर जख्मी मधील प्रंशात रमेश सोनवणे याला पुढील उपचारासाठी सिल्लोड येथील खाजगी रुग्णालयात भरती केले आहे.. कोठाकोळी येथील हे तिघेही तरुण सकाळी कामानिमित्त पिंपळगाव रेणुकाई येथे आले होते.दुपारी वीजेच्या कडकडाटासह रिमझीप पावसाला सुरूवात झाली.मात्र यामध्ये अचानक विज कोसळून गणेश जाधव व सचिन बावस्कर या तरुणाचा जागीच मृत्यू झाला तर जख्मी प्रंशात सोनुने हा गंभीर जख्मी झाला.मृतांना पिंपळगाव रेणुकाई येथील सरकार दवाखान्यात श्वविच्छेदनसाठी पाठविण्यात आले.घटनेतील मृत हा विवाहीत असुन त्याच्या पाश्चात पत्नी मुलगा,मुलगी असा परिवार आहे तर सचिन बावस्कर हा तरुण अविवाहित आहे.

### मानवी आरोग्यास घातक असलेला गांजा विक्री करणाऱ्या महिलेकडुन ०४ किलो ५७९ ग्रॅम गांजा जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जालना जिल्हयात अवैध गांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याचे मा. पोलीस अधीक्षक साहेबांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना अवैध गांजा विक्री करणारे व्यक्तीची माहिती काढुन त्यांचेवर कारवाई करण्याच्या सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्यानुषंगाने दिनांक १६/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे



शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती मिळाली की, चंदनझिरा येथे महिला नामे पुजा ओमप्रकाश नाईक रा. लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर, चंदनझिरा जालना हि तिच्या राहत्या घरामध्ये मानवी आरोग्यास हानीकारक असलेला गांजाची अवैधपणे स्वत:चे आर्थीक फायद्यासाठी विक्री करत असल्याची माहिती मिळाली. मिळाले बातमीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा जालना येथील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर, चंदनझिरा जालना येथे महिला नामे पुजा ओमप्रकाश नाईक, वय-३०, रा. लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर, चंदनझिरा जालना हिच्या घरी छापा मारुन तिच्या ताब्यातुन एकुण ४ किलो ५७९ ग्रॅम वजनाचा गांजा रु.९१,५८०/- किंमतीचा माल जप्त केला असुन सदर महिलेविरुध्द चंदनझिरा पोलीस ठाणे जालना येथे एन.डी.पी.एस. कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, जालना श्री. अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा जालना, सहा. पोलीस निरीक्षक श्री योगेश उबाळे, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, संभाजी तनपुरे, गोपाल गोशिक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, कैलास खार्डे, रस्तुम जैवाळ, प्रशांत लोखंडे, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, रमेश काळे, भागवत खरात, धीरज भोसले, सचिन राऊत, गणेश वाघ मपोअ/ कविता काकस, सत्यभामा उबाळे सर्व स्थागुशा यांनी केली आहे.

## येथे पाहिजे जातीचे, येरा गबाळ्याचे काम नोहे या संत वचनाप्रमाणे काम करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी आपली ताकद उभी करणे आवश्यक - आ . लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**प्रतिनिधी / परतूर**

रस्ते हे वाहतुकीचे एक अत्यंत महत्त्वाचे साधन आहेत. ज्यामुळे सामाजिक आणि आर्थिक विकास साधता येतो. रस्ते हे देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक आहेत. ते व्यापार, उद्योग आणि पर्यटन यांसारख्या क्षेत्रांना मदत करतात तसे ते सामाजिक विकासासाठी देखील आवश्यक आहेत. दर्जेदार रस्त्याच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांना शिक्षण, आरोग्य सेवा आणि इतर सामाजिक सुविधा मिळवण्यास मदत होते. रस्ते हे विकासाचे एक महत्त्वाचे साधन आहेत. ते लोकांना चांगले जीवन जगण्यास आणि विकासाच्या प्रवासात सहभागी होण्यास मदत करतात. त्याचप्रमाणे रस्ते हे मानवी जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहेत. ते आपल्या जीवनातील अनेक समस्या सोडवतात आणि विकासाला चालना देतात असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले. माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून परतुर तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत २५ किमी सिमेंट रस्त्याच्या बांधकामाकरिता सुमारे ३० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून आज रोहिणा-वैजोडा फाटा रा.म.मा. ५४८ सी ते वैजोडा सिमेंट रस्ता (४.८३ कोटी रुपये). आंगलगाव येथे सातोना ते आंगलगाव सिमेंट रस्ता (४.६० कोटी रुपये) सोपारा येथे आष्टी-सातारा वाहेगाव-चंदू नाईक तांडा सिमेंट रस्ता (८.४० कोटी रुपये) कोकाटे हादगाव तांडा (चंदू नाईक तांडा) येथे आष्टी-सातारा वाहेगाव-चंदू नाईक तांडा सिमेंट रस्ता (८.४० कोटी रुपये) पांडे पोखरी रामा २२३ ते पांडे पोखरी सिमेंट रस्ता (४.२९ कोटी रुपये) कामांचे उद्घाटन आज आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते संपन्न झाले. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ही महाराष्ट्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून,



ग्रामीण भागातील रस्ते विकासाला प्राधान्य देणारी आहे. या योजनेअंतर्गत गावांना बारमाही रस्त्यांनी जोडण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते, शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडणे सुलभ होते आणि शिक्षण-आरोग्य सुविधांचा लाभ घेणे सोयीचे होते. परतूर तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते कनेक्टिव्हिटीला चालना देण्यासाठी सिमेंटचे दर्जेदार रस्ते मंजूर करण्यात आले आहेत असेही माजीमंत्री आमदार श्री. बबनराव लोणीकर यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, की ग्रामीण विकास, पायाभूत सुविधा आणि शेतीसाठी अनेक योजना राबविल्या. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत परतूर तालुक्यातील रस्त्यांसाठी आपण विशेष निधी मंजूर करवून घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे गेल्या काही वर्षांत तालुक्यातील अनेक गावांना पक्के रस्ते, पाणीपुरवठा, वीज आणि शिक्षणाच्या सुविधा मिळाल्या आहेत. ग्रामीण भागाचा विकास हाच माझा मुख्य अजेंडा आहे. या रस्त्यांमुळे गावकऱ्यांचे जीवनमान सुधारेल आणि शेतकऱ्यांना आपला माल बाजारात नेण्यासाठी सोयीचे होईल. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून परतूर तालुका विकासाच्या नव्या टप्प्यावर पोहोचेल. रस्ता तयार झाल्यानंतर किमान पंधरा दिवसापर्यंत कुठलेही वाहन जाणार नाही याची जबाबदारी व काळजी गावकऱ्यांनी घ्यावी असे आवाहन यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित त्यांना केले. यावेळी भाजपा परतूर तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे सभापती संभाजी वारे रवी सोळंके दिगंबर मुजमुले तहसीलदार प्रतिभा गोरे गटविकास अधिकारी राजेश तांगडे कार्यकारी अभियंता कोल्हे उपअभियंता मस्के गजानन लोणीकर परमेश्वर आकात पद्माकर कवडे लक्ष्मणराव टेकाळे मिरज खतीब नामदेव खोसे बाळासाहेब तनपुरे लक्ष्मण गवळी रामप्रसाद गिरी वसंत राजबिंडे अशोक खंदारे विठ्ठल खंदारे रंगनाथ रंगे भगवान आरडे बाळाभाऊ मीठे आसाराम मिठे गणेशराव मिठे सुधाकर मिठे आप्पासाहेब काटे अशोक शेळके रामभाऊ वाटाणे नागेश ढवळे बाबाराव थोरात बाबुराव गोसावी मधुकर मोरे अमोल पवार गणेश राठोड मुरलीधर राठोड संतोष राठोड माऊली चव्हाण विलास चव्हाण भीमराव राठोड गजानन लिपणे कोंडीराम आकात भास्कर आढळकर विक्रम लिपणे प्रसाद खंदारे विश्वंभर कसे भगवानराव खोसे सखाराम गवळी गणेश गवळी सचिन टेकाळे शिवाजी अवचार गोविंद यादव संदीप तनपुरे कृष्ण भदरगे सुरेश गवळी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ तिरंगा सन्मान यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

पहलगाम येथे झालेल्या भारतीय नागरिकांवरील भ्याड हल्ला व नंतर केंद्र सरकारने व भारतीय सैन्याने दहशतवादाचा समूळ नाश करण्यासाठी व हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या देशवासीयांच्या कुणाचा बदला घेण्यासाठी सुरू केलेले ऑपरेशन सिंदूर यशस्वी



झाल्यानंतर आपण भारतीय म्हणून या ऑपरेशन सिंदूरला पाठिंबा देण्याकरिता व जवानांनी केलेले हे अबूतपूर्व कामाचे गुणगान करण्याकरिता तिरंगा सन्मान यात्रा सुरू केली आहे. जाफ्राबाद तालुक्यात सुद्धा ही तिरंगा सन्मान यात्रा आयोजित केली आहे. दिनांक २१ मे बुधवार रोजी सकाळी १० वाजता टेंभुर्णी येथून या तिरंगा सन्मान यात्रेची सुरुवात देशाचे माजी केंद्रीय मंत्री श्री रावसाहेब पाटील दानवे साहेब, माननीय आमदार श्री. संतोष पाटील दानवे (अध्यक्ष पंचायत राज समिती महाराष्ट्र राज्य), नवनिर्वाचित भाजपा जिल्हाध्यक्ष माननीय आमदार श्री. नारायण कुचे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे. टेंभुर्णी पासून मोटरसायकल घेऊन जाफ्राबाद पंचायत समिती या सन्मान यात्रेचा समारोप होणार आहे. या यात्रेमध्ये माजी सैनिक व शहीद परिवारातील कुटुंबांच्या सदस्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते होणार असून तालुक्यातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने या यात्रेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन जाफराबाद भारतीय जनता पार्टी मंडळाचे अध्यक्ष नाना पाटील भागिले तसेच टेंभुर्णी मंडळाचे अध्यक्ष मनोज पाटील शिंदे आणि भारतीय जनता पार्टी जाफ्राबाद कार्यालयाचे प्रमुख उद्धव पाटील दुनगहु यांनी केले आहे.

# पणण मंडळाकडून उपबाजार पेठेकरिता मान्यता

### वडीगोद्रीत होणार उपबाजार पेठ

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

कृषि उत्पन्न बाजार समिती अंबडने मुख्ख बाजारपेठ वडीगोद्री येथील ले-आउट तयार करून त्यास मा. पणन संचालक, पुणे यांची मान्यता घेण्यात आली .दि १७मे वडीगोद्री येथील मार्केट यार्ड विकसीत करण्याच्या हेतूने मा. संचालक मंडळाने मंजुर ले-आउट नुसार गरजु व व्यापार करण्यास इच्छुक व्यापारी यांनी सदर मार्केट यार्ड मधील भुखंड हे लिज घर देण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे सदर मार्केट यार्ड मध्ये विविध बाजारपेठ उभा राहतोल ज्यामधे भुसार, कापुस, फळ व शेती पुरक व्यवसाय उभे राहतील. बाजार समितीने मंजुर ले-आउट नुसार मार्केट यार्ड मधील ३०८ भुखंड जाहिर लिलावाव्दारे वाटप करण्यास मा. पणन संचालक पुणे यांची भुखंड लिज मुल्यांकन व भाडे आकारणी सह मान्यता घेण्यात आली.

समितीने वरिल मान्यता घेउन मा. पणन संचालक पुणे यांनी दिलेल्या नियम व अटी नुसार सदर भुखंडाचे जाहिर लिलावाव्दारे वाटप करण्याचे निर्णन घेण्यात आला. समितीने सदर लिलावाची जाहिरात दैनिक वर्तमानपत्रामध्ये लिलावामध्ये भाग घेण्यास इच्छूक व्यापारी व इतर घटकांकडून अनामत रक्कम स्वीकारणे बाबतची जाहिरात दिनांक १४/०८/२०२४ व दिनांक ०७/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार समितीने इच्छूक व्यापारी यांचेकडून अनामत रक्कम जमा करून घेउन दिनांक २९/०८/२०२४ व १६/०९/२०२४ रोजी जाहिर लिलाव ठेवण्यात आला परंतु दोन्ही वेळी स्थानीक गावकऱ्यांच्या नाराजीमुळे कायदा व सुव्यवस्थे चा प्रश्न निर्माण होऊ नये यामुळे त्यांच्याशी चर्चा करुन संचालक मंडळाने निर्णय घेऊन लिलाव स्थगीत करण्यात आला.

सदर लिलावास विरोध स्थानीक गावकऱ्याकडून होत असल्यामुळे समितीने त्यांचे सोबत चर्चा करण्याचे निश्चित करून त्यांचे सोबत चर्चा करण्यासाठी दिनांक २४/०३/२०२५ रोजी मा. तहसिलदार अंबड, मा. जिल्हा उपनिबंधक जालना, मा. सहा. निबंधक अंबड व मा. सभापती कृषि उत्पन्न बाजार समिती सचिव व संचालक मंडळ यांचे उपस्थितीत सभा घेण्याचे निश्चित करून सर्व निवेदन करते यांना पत्राव्दारे उपस्थित राहयाचे कळविण्यात आले परंतु दिनांक २४/०३/२०२५ रोजीच्या सभेसाठी कोणीच हजर राहिले नाही तेव्हा पुन्हा त्यांचे सोबत चर्चा करण्यासाठी दिनांक २४/०३/२०२५ रोजीच्या सभेमध्ये उपस्थित मान्यवरांनी दिनांक २५/०३/२०२५ तारीख निश्चित करून सर्व निवेदन कर्ते यांना उपस्थित राहणे बाबत सुचना करण्यात आली. परंतु दिनांक २५/०३/२०२५ रोजीच्या सभेसाठी एकही निवेदन करते हजर राहीले नाही त्यामुळे त्यांचे काहीच म्हणने नाही असे समजून प्रकरण संपुष्टात आल्याचे समजण्यात आले. त्यानंतर समितीने दिनांक २१/०४/२०२५ रोजीच्या दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करून दिनांक ०२/०५/२०२५ रोजी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन सदगुरु कृपा मंगल कार्यालयाचे हॉलमध्ये सदर जाहिर लिलाव घेण्यात आला. सदर लिलावा हा सर्व नियमांचे पालन करुन पारदर्शक पणे घेण्यात आला आहे.कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचीव यांनी सांगितले .

# डोणगांव शिवारात वीज पडून दोन बैल एक गायचा मृत्यू शेतकऱ्यावर संकट

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील डोणगांव परिसरामध्ये दि दि १९ रोजी दुपारी दुपारच्या वेळी अचानक वादळीवाऱ्यासह विजांच्या कडकटासह पावसाला झाली सुरुवात त्यामध्ये डोणगांव शिवारातील गट नंबर ३२ /३४ मध्ये पुंडलिक भगवान पुंगळे यांचे दोन बैल एक गाय लिंबाच्या झाडाखाली बांधलेले होते त्या लिंबाच्या झाडावर वीज पडून दोन बैल एक गाय यांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये एक लाख वीस हजार रुपयांचे नुकसान झाले शेतकऱ्यावर संकटाचा सामना शेतकऱ्यांना पेरणीच्या वेळी अचानक आलेल्या पावसाने विजाच्या कडकटासह शेतकऱ्यावर दुबार संकट शेतकऱ्याच्या जाफराबाद येथील महसूल विभाग व कृषी विभागाने झालेले फळबागायचे आंबा भाजीपाला पिकांचे नेट सेट शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ती नुकसान भरपाई वीज पडून झालेली नुकसान भरपाई शासनाकडून देण्यात यावी अशी मागणी होत आहे

नातेवाईकाकडून वीज पडून झालेले नुकसानाचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावा अशी मागणी शेतकरी व शेतकऱ्यांचे नातेवाईक करत आहे .



# भाजपाची भव्य तिरंगा यात्रा संपन्न

## देश सैन्यांच्या व पंतप्रधानांच्या पाठीशी - भाजप नेते श्री.रावसाहेब पाटील दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर, देशभरात तिरंगा यात्रा काढली जात आहे. (ता.१८) रविवारी जालना शहरात भव्य तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. यावेळी भाजपा नेते तथा माजी मंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे आणि भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, भाजपा जालना ग्रा.जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, माजी मंत्री आ.बबनरावजी लोणीकर, माजी मंत्री आ.अर्जुनरावजी खोतकर, आ.संतोष पाटील दानवे यांच्यासह जालना शहरातील नागरिक तिरंगा यात्रेत सहभागी झाले होते. यावेळी श्री. रावसाहेब पाटील दानवे यांनी सांगितले की, देश लष्कर आणि पंतप्रधान मोदींच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, ही यात्रा देशाची आहे. येथे अनेक लोक तिरंग्यासाठी उभे राहिले आहेत. ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर, देशभरात तिरंगा यात्रा काढली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने लष्करी शक्तीचा योग्य वापर करून जगाला संदेश दिला आहे की, भारत दहशतवादाविरुद्ध गप्प बसणार




नाही. भारतीय सैन्याने शौर्य दाखवले आणि दहशतवाद्यांचे अड्डे उद्धुस्त केले. तिरंगा हा आपल्या सन्मानाचे, प्रतिष्ठेचे आणि अभिमानाचे प्रतीक आहे. देशाची गौरवशाली परंपरा जाणून घेणे आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचा आदर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, ही यात्रा देशाच्या एकतेचे, अखंडतेचे आणि शूर सैनिकांना श्रद्धांजलीचे प्रतीक आहे असे हि ते म्हणाले. या तिरंगा यात्रांमध्ये माजी सैनिकांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. यामध्ये देशप्रेमींनी भारत माता कि जय, इंडियन आर्मी झिंदाबाद, ऑपरेशन सिंदूर झिंदाबादच्या घोषणा दिल्या. हि तिरंगा पदयात्रा जनार्धन मामा चौक येथून सुरु होऊन स्वातंत्र्यवीर सावरकर चौक-टांगा स्टैन्ड् ते बडी सडक येथील श्री राम मंदिर येथे महाआरती करून समारोप करण्यात आल. सदरील भव्य तिरंगा रॅली पदयात्रेस देशप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी या भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजक भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सर्व देशप्रेमींचे, माजी सैनिकांचे व जालना शहरातील नागरिकांचे सहभागी झाल्याबद्दल आभार मानले.

तरुण भारत
www.tarunbharat.org
कला साहित्य संस्कृती

# गणपती बाप्पा मोरया...



२३ सप्टेंबर २०१०. अनंत चतुर्दशीच्या दिवशी मी सेफ्टी कौन्सिलर या पदावर कार्यान्वित असताना घडलेली ही घटना आहे. बहुदा सात-आठ दिवस अगोदर झालेल्या एका गुडस् ट्रेन डिरेलमेंटच्या चौकशी संदर्भात आमच्या सेफ्टी ब्रँचमध्ये तीन संबंधित ऑफिसर त्या संदर्भातील झालेल्या इन्क्वायरीचे पेपर्स घेऊन फाइंडिंग काढण्यात गुंग होते. वातावरण फारच गंभीर होते. सकाळी ११ पासून ही मीटिंग चालूच होती. आणि आता साडेचार वाजता आले तरी त्यांचे फाईंडिंग काही निघेनात.. आमच्या डी.एस.ओ. साहेबांची फॅमिली मुंबईलाच होती. आणि ते येथे सोलापुरात एकटेच राहत होते.. अगोदरच इन्क्वायरीमध्ये या अधिकाऱ्यांची माथी गरम झाली होती. त्यामुळे आजच्या अनंत चतुर्दशीच्या दिवसाचं त्यांना काही पडले नव्हते. सकाळी घरातून ऑफिसला निघताना सौ.ने बजावून सांगितले होते की, आज गणपती विसर्जनाकरता तुम्ही शक्यतो ऑफिसमधून लवकर या.. आणि आता ऑफिस बंद व्हायची वेळ आली. तरी त्यांची चर्चा काही संपेना. आम्ही पाची सेफ्टी कौन्सिलर्स बाहेर आमच्या आम च्या खुर्चीवरती स्थितप्रज्ञ दृष्टी ठेवून बसलो होतो. आमचं काम एकच.. बोलावले की आत जायचे, काय त्यांना पाहिजे असेल ती, किंवा फाईंडींग संदर्भात काही रूल बुक्स किंवा एक्सीडेंट मॅन्युअलम धील काही संदर्भ याविषयी मदत करायची एवढेच. तेवढ्यात आतून आमचा चपरासी बाहेर आला. आणि आम्हाला उद्देशून साहेबांचा निरोप देता झाला, की जरी सहा वाजता ऑफिसचा सगळा स्टाफ निघून गेला, तरी आम्ही पाची सेफ्टी कौन्सिलर्स यांनी डी.एस.ओ. साहेबांच्या परवानगीशिवाय ऑफिस सोडायचे नाही. किंवा घरी निघून जायचे नाही. झाले. आम्ही एकदम चिडून गेलो, मनातूनच. करणार तरी काय? ऑफिसरच्या आज्ञे बाहेर तर जाता येत नाही.. आणि आतून एखाद्या सेफ्टी कौन्सिलरला बोलावणे आले, आणि तो गुपचूप निघून गेला असेल तर काय करायचं.? सस्पेन्शनला सामोरे जाण्याशिवाय त्याला पर्याय नाही. म्हणून माझी चलबिचल होऊ लागली. त्यातून बाकीच्या चार सेफ्टी कौन्सिलर्सची माझ्यासमोर कुजबुज. पाटील साहेबांनाच जास्ती बोलावले जाते, कारण ते ट्रॅफिक वाले आहेत ना. पण तरी देखील सिग्नलिंगआणि लोकोचे कौन्सिलर मला म्हणू लागले, 'पाटील साहेब.. तुम्ही घरी जाऊन गणपती घेऊन जावा कंबर तलावला. पटकन गणपती विसर्जन करून वहिनींना तिथूनच रिक्षाने घरी पाठवून द्या. आणि तुम्ही ताबडतोब परत ऑफिसमध्ये या. कारण अंधार पडल्यानंतर गणपती विसर्जन करणे त्रासदायक होईल.पाउण-एक तासाच्या आत तुम्ही परत सुद्धा येताल.. आम्ही इकडे कसे तरी सांभाळून घेऊ.' मला त्यांचे बोलणे पटले. तरीसुद्धा मी काहीतरी निमित्त काढून चेंबर मध्ये गेलो. पाहतो तो स्टेनोला डिक्टेशन चालू होते. त्यामध्ये सुद्धा वादावादी. मी ओळखून घेतलं. अजून तास- दीड तास हे काही संपणार नाही. मी झटक्यात निर्णय घेतला आणि सहकार्यांना सांगून बाहेर पडलो. दहा मिनिटात घरी पोहोचून सौ.ला सर्व कल्पना दिली. मग फक्त हात पाय धुवून अर्धा कप चहा घेतला. बाप्पाची आरती करून बाप्पाला जागेवरून हलवले. छोट्या पाटावर श्रींची मूर्ती ठेवून सौ.ला मागे स्कूटर वर पाटावरील श्रींच्या मूर्ती सह बसवून कंबर तलाव गाठला. आणि गत दहा दिवस मनोभावे पूजलेल्या बाप्पाला थोडेसे हळवे होऊन गडबडीतच निरोप दिला. सौ च्या हातामध्ये चुरमुरे फुटाणे ची पिशवी होती, तेथे जम लेल्या बालकांमध्ये तिचे वाटप करून सौ. ला रिक्षात बसवून ताबडतोब घरी पाठवले. आणि मी तडक ऑफिस गाठले.. बरोबर साडेसात वाजले होते. अजूनही साहेब लोकांचे डिस्कशन वगैरे चालू होते. मी चौकशी केली, 'मला आतून बोलावणे आले होते का?' तर सहकार्यांचे हास्य मुद्रेने नकारात्मक उत्तर मिळाले. बरे वाटले. जीव भांड्यात पडला. तेवढ्यात डी एस ओ साहेबांनी मला आत बोलावले. आणि काही पेपर मला वाचायला देऊन, त्यावर माझे मत विचारले. अजून काही राहिल आहे का, या दृष्टिकोनातून. मला त्यात थोड्याशा त्रुटी आढळल्या .आणि त्या त्यांनाही पटल्या. थोडासा त्रासिक चेहरा करून त्यांनी चर्चा येथेच थांबवण्याचा निर्णय घेतला. व उद्या कंटिन्यू करून फायनल करू, असे बाकीच्या दोघांची सहमती घेऊन ठरवले गेले. मग साहेबांना आठवण झाली आज अनंत चतुर्दशी असल्याची. माझ्या खांद्यावर हात ठेवून मला विचारते झाले 'पाटील ,तुम्हा सर्वांचे गणपती विसर्जन, आजच असेल ना, झाले का? आज आनंद चतुर्दशी आहे हे माझ्या डोक्यातून स्किप झाले.. यावर साहेबांना मी पटकन उत्तर दिले,' आपली आज्ञा होती, ऑफिस सोडायचं नाही. कसं जाणार साहेब.. तुमच आपलं बरआहे.. घर मुंबईला. त्यामुळे तुम्हाला अनंत चतुर्दशीचं काही देणं घेणं नाही.' .... अर्थात या साहेबांशी माझे अत्यंत खेळी मेळीचे संबंध होते. म्हणून मी तसा थोडासा ओव्हरच रिऍक्ट झालो. मग साहेब काळजीच्या सुरात बोलले.. 'म्हणजे अजून तुमचं गणपती विसर्जन झाले नाही..? त्यावर त्यांना मी म्हटले, 'कॉलनीच्या इतर गणपतीं बरोबर सौ. ने पाठवला. पण भयंकर नाराज आहे. आणि आता गेल्यावर मला तोफखान्यास सामोरे जावं लागेल.'

तर ते मला म्हणाले, 'पाटील, मला आत येऊन सांगायचं होतं, मी तुम्हाला लगेच जा म्हणले असते..' तेवढ्यात त्यांचे सहकारी चेंबर मधून बाहेर निघाले. आणि ऑफिस बंद होऊन आम्ही पण घरी जाण्यास निघालो. आता पुढची मजा बघा....


दुसऱ्या दिवशी सकाळी सहा साडेसहा पर्यंत गाढ झोपलो होतो. मोबाईल फोन रींग मुळे माझी झोपमोड झाली. फोन उचलला. पाटील साहेब, तुमचे हार्दिक अभिनंदन. आजचा पेपर पहा .तुमचा आणि वहिनींचा फोटो आलेला आहे. आमच्या सोलापूर सेंट्रल कॅबिन मधील केबिन एस.एम.चा फोन होता. मी ताडकन उठलो. माझी झोपच उडाली. त्याने पुढचा खुलासा केला की 'तुम्ही उभयता गणपती विसर्जनाला जात असताना कंबर तलावाजवळ वार्ताहरांनी घेतलेला फोटो आहे, तुमच्या हातात श्रींची मूर्ती आहे आणि वहिनींच्या हातात चुरमुऱ्याची पिशवी असावी ..फार मस्त आणि क्लिअर फोटो आलेला आहे.. वगैरे वगैरे'.. पटकन बाहेर येऊन मी आमचा पेपर आलेला आहे का हे पाहिले. कारण आम्ही पण लोकमतच घेत होतो. पेपर आलेला होता. उत्सुकतेने पेपर उघडला. आतील पानावर आमचा तो फोटो दिसला.. खूप सुंदर आणि क्लियर. माझ्या अंगावर व्हाईट जीन पॅन्ट आणि निळा जीन्सचा शर्ट.. इन केलेला..मन आनंदून गेले.. कोणी काढला, केव्हा काढला असेल, आपल्याला काहीच समजलं कसे नाही, वगैरे वगैरे विचार मनात डोकावून गेले. पण क्षणातच, पुन्हा आनंदी झालो.. सौ. ला ही फोटो दाखवला. तिला सुद्धा खूप आनंद झाला.. मला तेवढ्यात काहीतरी डोक्यात एकदम क्लिक झाले... आणि क्षणार्धातच चेहऱ्यावरचा आनंद मावळला.. ओळखा बरं मित्रांनो. काय कारण असेल याचं.. हां तेच ते..बरोबर ओळखले.. आता मी दहा वाजता ऑफिसला जायच्या आतच या फोटोची बातमी सगळीकडे पसरलेली असेल. आणि आजचाच पेपर आहे... आमच्या डी एस ओ साहेबांनी सुद्धा हा फोटो पाहिला असेल. कारण ते सुद्धा वाचक आहेत.. मग मला आमचे काल संध्याकाळचे संभाषण आठवले.. मी स्वतः ऑफिस मधून वेळात वेळ काढून घरी येऊन सौ. सोबत गणपती विसर्जन केले होते.. आणि साहेबांना काय सांगितलं खोटे 'की मी घरी गेलो नाही. आणि कॉलनीतल्या गणपतींबरोबर गणपती विसर्जनासाठी पाठवला'



साठवणीतील आठवणी
● अनिल पाटील, पुणे
८००७७१६३२१

माझ्या मनातली भीती मी सौ. जवळ प्रकट केली. पण ती घाबरली नव्हती. उलट मला म्हणू लागली. 'हे साहेब लोक मोठ्या मनाचे असतात. ते तुमचे कौतुकच करतील. अभिनंदन करतील .म्हणून चेहरा पाडून बसू नका. तयार होऊन ऑफिसला निघा.' मला पटलं. चेहरा परत पूर्ववत आनंदी केला. आणि ऑफिस गाठले.. मनात एकच विचार मी खोटे बोललो. पण त्याच समर्थन कसे करू? आणि आता तर पुरावा म्हणून ढळढळीत हा फोटो.... एवढ्यात साहेबांची टाटा सुमो ऑफिस समोर थांबल्याचा आवाज आला.आम्ही सर्व सेफ्टी कौन्सिलर्स सावरून खुर्चीवर विराजमान झालो. डोक्यात एकच विचार. साहेबांनी बोलवले, आणि पेपर मधला फोटो दाखवून खुलासा विचारला, तर काय उत्तर द्यायचं? काही सुचेना. एवढ्यात प्यून ने जवळ येऊन मला काय सांगावं, कोणीतरी माझा फोटो असलेला पेपर साहेबांच्या टेबलावरच त्यांना दिसेल अशा बेताने ठेवलेला आहे... आता मात्र माझी भीती पार गेली. मनात म्हटले, 'चला पाटील ,आलिया भोगासी असावे सादर.' लगेच दहा मिनिटाच्या आत साहेबांनी बेल मारली. पटकन प्यून आत गेला. एक मिनिटाच्या आतच तो बाहेर येऊन साहेबांनी मलाच आत बोलावले आहे, असे सांगू लागला. मी जणू काही याचीच वाट पाहत होतो अशा भावनेने डॅशिंग चेहरा करून आत गेलो... गुड मॉर्निंग केले सरांना.. मला पाहिल्यावर साहेब पटकन खुर्चीवरून उठले आणि आनंदाने हात हातात घेऊन 'अभिनंदन पाटील, आज तुम्ही उभयता लोकमत मध्ये झळकलात. फार छान आला आहे फोटो', असे मला म्हणाले.. यावर मी चेहरा थोडासा पाडून त्यांना, 'सॉरी सर मी आपणास काल याबाबत खोटं बोललो.' असे प्रत्युत्तर दिले. त्यावर त्यांनी काय म्हणावे?...' लेट इट गो. आज तुम्ही आनंदात असताल. आम्हाला पण आनंदी करा. सगळ्या ऑफिस स्टाफ ला मस्त चहा पाजा.' असे म्हणून त्यांनी प्यून साठी बेल मारली, आणि तो आत आल्यावर त्याला बाहेरील स्टाफ ची गणती करून त्याप्रमाणे तेवढ्या चहाची ऑर्डर द्यायला सांगितले.... चला,मनावरचे दडपण दूर झाले. बाप्पा मला पावला. पण सत्य कधीच झाकले जात नाही, याचीही प्रचिती आली.. गणपती बाप्पा मोरया....

# एकाक्ष...




## सॉफ्ट पेस्टल्स आणि पेपर

सकाळची सकाळची वेळ होती. मी ओपीडीत बसलो होतो. नेहमीप्रमाणे लोकांची गर्दी होती. आमच्या ओपीडीत येणारे रुग्ण हे वयस्कर असतात, त्यांना ऐकायला कमी येत असते. मोतीबिंदूमुळे दिसायला कमी झालेले असते. अशा रुग्णांना बोलते करून त्यांची तपासणी करणे हे थोडे जिकिरीचे काम आहे.

तेवढ्यात एक बाई एका रुग्णाला हाताला धरून घेऊन आली. एक साधारण पन्नाशीतला गृहस्थ असावा, त्याला लहानपणापासून एका डोळ्यात फुल पडले होते. आता दुसऱ्या डोळ्यानेही त्याला दिसायचे कमी झाले होते. तपासणी केल्यानंतर त्याला मोतीबिंदू झाला होता असे आढळले. त्याला मोतीबिंदूच्या ऑपरेशनसाठी ॲडमिट करून त्याचे ऑपरेशन केले. मोतीबिंदू काढून त्याला कृत्रिम नेत्र भिंग बसवल्यानंतर त्याची दृष्टी चांगली झाली. स्वारी एकदम खुश झाली आणि मला व माझ्या सर्व सहकाऱ्यांना धन्यवाद देऊ लागली.



एका कुंचल्याचे भावविश्व
डॉ. सुहास सरवदे, सोलापूर
९४२२०६६८६६

जेव्हा हा रुग्ण ओपीडीत आला तेव्हाच त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण चेहऱ्यामुळे त्याने माझे लक्ष वेधून घेतले होते. सहसा अशा व्यक्तीचे चित्र कोणी काढत नाही. कारण आपल्या सौंदर्याच्या व्याख्या ठरलेल्या आहेत. पण मी या व्यक्तीचे चित्र काढायचे ठरविले. हे चित्र मी सॉफ्ट पेस्टल्स या माध्यमातून साकारले आहे. सॉफ्ट पेस्टल्स हे तसे नाजूक माध्यम आहे. यामध्ये खडूने रंगवताना रंगांचा फार विचार करून रेखाटन करावे लागते कारण यात रंगावर रंग सहसा देता येत नाही. पाश्चिमात्य देशात या माध्यमाचा वापर करून काही चित्रकारांनी अप्रतिम चित्रे रेखाटली आहेत. आपल्याकडे या माध्यमाचा वापर तसा नवीनच आहे. प्रख्यात चित्रकार देगा, मेरी कासट, रेनॉ, मिल्लेट यांनी या माध्यमाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. मी या चित्रात त्या माणसाची व्यक्तीरेखा जिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे. खरे तर व्यक्तिचित्रामध्ये जिवंतपणा हा त्या व्यक्तीच्या डोळ्यातून दर्शवता येतो. परंतु या चित्रामध्ये त्या व्यक्तीला डोळ्यामध्ये फुल असल्याने माझ्यासाठी या चित्रात जिवंतपणा आणणे हे एक आव्हानच होते. प्रस्तुत चित्रात जिवंतपणा आहे का नाही हे ठरविणे हे काम तुम्हा रसिकांचे आहे.

खरे पाहता समाजात डोळ्यात फुल पडलेल्या व्यक्तीकडे बघण्याचा दृष्टिकोन फारसा चांगला असत नाही. डोळ्यात फुल असणे हे फार मोठे व्यंग आहे. समाजात अशा व्यक्तीला शक्यतो टाळले जाते. लग्नासाठी योग्य वर किंवा वधू मिळणे सोडाच पण शाळा कॉलेजात चांगला मित्र किंवा मैत्रीण भेटणे ही साधी गोष्ट देखील त्यांच्यासाठी दुरापास्त आहे. अशा व्यक्ती थोड्याशा एकलकोंड्या , निराश आणि परिस्थितीशी जुळवून न घेता आल्यामुळे खचलेल्या असतात. परंतु माझ्या ओपीडी त आलेला गृहस्थ बराच आशावादी होता. त्याची त्याच्या नशिबाबद्दल तक्रार नव्हती. माझ्या पाहण्यात अशा बऱ्याच अपंग व्यक्ती आहेत ज्या आपल्या अपंगत्वाबद्दल खंत करीत नाहीत. ते जीवनात इतक्या सहजपणे वावरतात की त्यांना काही अपंगत्व आहे असे जाणवतही नाही.

मी मेडिकल कॉलेजमध्ये कामाला असल्यामुळे अंधत्वाचे प्रमाणपत्र देणे हे एक महत्त्वाचे काम माझ्याकडे आहे. पण मी पाहिले आहे की जन्मापासून दोन्ही डोळ्यांनी अंध असलेली मुले किंवा व्यक्ती या मुळीच निराश नसतात, ते अंध शाळेत जातात, पुढे कॉलेजम धून शिक्षण घेऊन जीवनात काहीतरी करण्याची जिद्द बाळगतात. एकदा एक अंध शाळेतील विद्यार्थी माझ्याकडे आला होता. मी त्याला सहज विचारले की अंधशाळेत तुम्ही विरंगुळ्यासाठी काय करता? तर तो म्हणाला आम्ही टीव्ही पाहतो. म्हणजे टीव्ही वरील मालिका ऐकतो. आम्हाला अमिताभ बच्चनची' कौन बनेगा करोडपती' ही मालिका आवडते. तो पुढे म्हणाला की त्याने या मालिकेसाठी ऑडिशन दिली आहे. मला त्याच्या उत्साहाचे कौतुक वाटले. पुढे काही वर्षांनी तो मेडिकल बोर्डला आला. मी त्याला विचारले असता त्याने त्याची टायपिस्ट या पदावर नियुक्ती झाली असे सांगितले. मी थोडा बुचकळ्यात पडलो. म्हणालो अरे कारकुनाला तर टायपिंग, डिक्टटेशन यायला पाहिजे. तो म्हणाला तुम्ही सांगाल ते मी टाइप करू शकतो. मी गंमत म्हणून त्याला काही ओळी सांगितल्या. त्याने त्या बरोबर टाइप केल्या. एक पूर्ण अंध व्यक्ती टायपिस्टचे काम करू शकते, हे बघुन मी थक्क झालो व त्याला मुकाटयाने फिटनेस देऊन मोकळा झालो. मी माझ्याकडे आलेल्या अंध मुलांना नेहमी विचारतो की ते पुढे काय करणार आहेत. सर्वांचे पुढे शिकण्याचे प्लॅन तयार असतात. कोणीही उदास किंवा निराश असलेला मला कधीही आढळला नाही.

आजकालच्या धडधाकट आणि निरोगी तरुणांनी या गोष्टीपासून खूप काही शिकण्यासारखे आहे. हेलन केलर यांनी तर जन्मजात अंध व बधिर असताना त्यावर मात करून, एक यशस्वी लेखिका, प्राध्यापिका आणि समाजसुधारक म्हणून उत्तुंग कार्य केले. एखादी व्यक्ती त्याच्या अपंगत्वावर मात करून आयुष्यात स्थिर होत असेल तर आपल्यासारख्या निरोगी माणसाने निराश व्हावयाचे कारणच नाही. म्हणतात ना जिद्दीच्या जोरावर 'पंगू लंघयते गिरीम'.

# अवघड कोडं, खाली शिपाई वर घोडं

'परदुःख शितळ' असा एक वाक्प्रचार आपणास वारंवार ऐकायला मिळतो. परदुःख शितळ म्हणजे काय तर इतरांचे दुःख सौम्य, कमी तीव्रतेचे वाटते. उलट पक्षी आपलं मोहरी एवढं दुःख सुद्धा पर्वताएवढं वाटते. हीच गोष्ट सम स्यांच्या बाबतीतही घडते. 'फक्त मलाच समस्या आहेत. म ाझ्यासारखा पिडीत कोणीच नाही.' असे वाटून माणूस खचतो. हे असे का होते तर आपला त्या विशिष्ट समस्येकडे, संकटाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तसा असतो. जसा दृष्टिकोन तशी सम स्या. सरळसरळ विचार केला तर समस्येवर उपाय सहज सापडतो पण ' मला अपयशच आलं तर', 'हे फार अवघड आहे', 'माझ्या हातून हे होणारच नाही' असा नकारात्मक विचार केला तर मात्र समस्या बागलबुवाचं रुप धारण करते हे नक्की. हीच गोष्ट अगदी कमी शब्दात सांगणारी ही म्हण..




**म्हण - अवघड कोडं खाली शिपाई वर घोडं**

या म्हणीचा शब्दशः अर्थ असा आहे की ही बाब किती अवघड, क्लिष्ट आहे ? घोड्यावर शिपाई म्हणजे सैनिक बसणे उचित पण इथे मात्र शिपायावर घोडं बसलं आहे ! हे एक कठीण कोडंच आहे.

या म्हणीचा लाक्षणिक अर्थ असा की वास्तवाच्या विपरीत परिस्थिती असणे किंवा दिसणे. अशी परिस्थिती हाताळण्यास अवघड, कठीण व क्लिष्ट वाटते. पण खरे तर त्या परिस्थितीकडे बघणारी व्यक्ती नकारात्मक दृष्टीकोनातून बघते म्हणून ती क्लिष्ट वाटते. शिपायाच्या पाठीवर घोडा बसणे वास्तवात शक्य आहे काय ? तर नाही. फक्त ती व्यक्ती पाहताना आपलं डोकं जमिनीकडे करून म्हणजेच सरळ न पाहता उलट पाहते म्हणून तसे दिसते. सहज सोप्या पर्यायांचा विचारच त्याला सुचत नाही इतकेच. याचाच अर्थ असा की एखादी समस्या किंवा अडचण वाटते तितकी कठीण किंवा अवघड नसते. ती सोडविण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा असतो.

**उपयोगाचे उदाहरण -** हर्षदा आजचा स्वयंपाक तूच करायचास बघ. ' अवघड कोडं न् खाली शिपाई वर घोडं ' असं काऽऽही नाही. समजलं ?

**रुपक कथा -** अमरसिंहला भारतीय सैन्य दलाचा खुप अभिमान आणि आदर वाटत होता. त्याच्या घरात गेल्या तीन पिढ्यांपासून भारतीय सैन्य दलात सेवा करण्याची परंपरा चालत आलेली आहे. त्यामुळेच आपणही सैन्य दलात मोठ्या हुद्द्यावर सेवा बजावावी असे अमरला वाटत होते. पण भरतीपूर्व शारिरीक क्षमता चाचणीची त्याला भिती वाटत होती. आपण ती सक्षमपणे पार पाडली नाही तर घराण्याला अपयशाचे गालबोट लागेल ही धास्ती त्याला सतत लागलेली होती. बरं ही गोष्ट घरातील कोणाला बोलावी तर आपलेच हसे होईल म्हणून तो आतल्या आत कुढत होता.



बोलीचं बोलणं
● संध्या धर्माधिकारी, सोलापूर
९९२२१५६३३५

त्या दिवशीही तो सराव करण्यासाठी मैदानावर गेला पण सराव न करता इतर मुलांच्या रनिंग, नकल पुश अप, वन आर्म्ड पुश अप, जंम्पींग इत्यादी कसरती बघून हतबल झाला. आपण इतक्या सराईतपणे हे सर्व नाहीच करु शकणार या विचाराने तो आणखीच निराश झाला. त्याचा जिवलग मित्र सुजय मध्येच सराव थांबवून अमरला म्हणाला.

अमर, असा का बसला आहेस ? प्रॅक्टीस नाही का करायची ? तुमचा सराव बघता मला काहीच जमत नाही रे ! माझ्याकडून काहीच होणार नाही.. ए रडू बाई, अरे करायला सुरवातच केली नाहीस तर कसं येईल ? एवढं कठोर परिश्रम जमेल मला ? त्यात काय ' अवघड कोडं न् खाली शिपाई वर घोडं ' ? निश्चित जमेल. तू फक्त 'मी करणारच' असा विचार कर. सगळं व्यवस्थित होईल. सुजयचे बोलणे ऐकून अमर उत्साहाने सराव करु लागला.

# भावस्पर्शी कवयित्री संगीता टकले - मासाळ

शिक्षणातून ज्ञान देणाऱ्या,शिक्षिका पेशातुन एक संस्कारक्षम पिढी घडविणाऱ्या, आणि साहित्यातुन समाज घडविणाऱ्या,एक कवयित्री म्हणजे संगीता मासाळ होय...

संगीता मासाळ यांचे वडील रयत शिक्षण संस्थेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते.आई गृहिणी तिला शिक्षण घेता आले नाही म्हणून तिने मुलींनास शिकवले. वडिलांची सतत बदली होत असायची. त्यामुळे कवयित्री संगीता मासाळ यांना शिक्षण सर्व फिरतीवर करावे लागले .शालेय जीवन ग्रामीण भागातून झाले. शाळेत जाण्यासाठी पाच सहा किलोमीटर पायी चालत जावे लागायचे. केवळ शिक्षणाची आवड आणि मनातील ध्येय,जिद्द,चिकाटी,असल्यामुळे हे करता आले हे लक्षात येते.

वडील शिक्षक असल्यामुळे शिक्षणासाठी वातावरण खुप पोषक होते..त्यामुळे कुटुंबातील सर्वच उच्चशिक्षित आहेत.याचा अपूर्व आनंद कवयित्रीला आहे.

संगीता मासाळ यांना शाळेत जाताना सभोवती झाड,पाने,फुले, पाऊस, नदी असे चित्र दिसायचे. ते निसर्गाचे लावण्य पाहून मोहिनी पडायची. त्यांच्याकडे एकटक पहात रहावे असे वाटायचे.ती सर्व हिरवाई, आणि निसर्गाची संगीतमय प्रसन्नता संगीता यांच्या मनात स्थिरवली. त्या विहंगम दृष्याशी, त्या वसुंधरेशी त्या संवाद



संगीता टकले - मासाळ

करत राहिल्या. ते धरतीवरचे मनोहारी दृश्य पाहून कुतूहल वाटायचे. खरंच ईश्वराची किती म ोठी लीलया आहे असे वाटायचे. त्यात भान हरपून जायच्या. आणि तेव्हाच मनात शब्द फ ेर धरू लागले. व कॉलेजच्या वळणावर कवितेने कवयित्रीचे बोट धरले. ती तिची सखी झाली. कवयित्री देखील मनातील स्वगत मांडू लागली.जे सुचेल, त्या भावना शब्दबध्द करीत राहिल्या आणि दुसरे महत्वाचे म्हणजे त्यांना वाचनाची गोडी असीम होती. शाळेत असताना पाठ्यपुस्तकातील धडा आणि कविता यांच्या लेखकांची नावे पाहून मनात एक उत्सुकता दाटून यायची ही कशी लिहीत असतील? हे मनात घर करून बसले. आणि आपले कधी येईल नाव असे, असेही क्षणिक वाटायचे. रेडिओ वरील गाणी ऐकायला आवडायची .आजही आवडतात. ती ही प्रेरणा त्यांच्या लेखनासाठी आहे.शिक्षण हिंदीमधून झाले परंतु मराठी भाषा आपली बोली यावरील प्रेम अतूट राहिले आहे. जेव्हा संगीता मासाळ वहीमध्ये काहीतरी लिहीत होत्या आणि ते एके दिवशी वडिलांना पहाण्याची उत्सुकता निर्माण झाली .त्यामध्ये कविता,लेख असे लिहिले होते. तेव्हा त्यांच्या वडिलांनी ती वही त्यांचे मित्र कवी प्रकाश जडे सरांना दाखवली.त्यांचा अतिशय चांगला रिमार्क पाहून संगीता



स्त्री कवयित्रींचे स्मरण...
● वंदना कुलकर्णी
९६५७०९५८६२

मासाळ यांना लिहिण्याची अधिक ऊर्जा निर्माण झाली. लेखनासाठी छोटी,छोटी,व्यासपीठ प्राप्त झाली. वृत्तपत्रातून मनातील भावना व्यक्त करण्याची सुवर्ण संधी प्राप्त झाली. हळूहळू प्रोत्साहन मिळत गेले. आणि पुढे अनेक कविता, लेख लिहिले, सूत्रसंचालन ही एक उत्कृष्ट कला अवगत आहे.

कॉलेजचे सर्व शिक्षण त्यांनी एम,ए,बी एड हे विवाहानंतर केले. त्यासाठी मिस्टरांचे सहकार्य लाभले. म्हणून त्या सध्या कर्मवीर औदुंबररावजी पाटील।विद्यालयात कार्यरत आहेत. २५ वर्ष त्या ज्ञान मंदिरात ज्ञानदानाचे कार्य केले.

एक शिक्षक म्हणून सेवाव्रती म्हणून कार्य करताना विद्यार्थ्यांच्या मनात सकारात्म कतेच्या ऊर्जेचा स्रोत निर्माण केला. आणि करत आहेत,म ुलींनी शिक्षण घेऊन सक्षम झाले पाहिजे स्वावलंबी असून आपल्या अस्तित्व जपलं पाहिजे. कारण आनंदाने जगण्याचा अधिकार सर्वांना आहे.असे त्यांना वाटते. शिक्षण घेताना स्वतंत्र विचारांच्या व्हा परंतु त्याचे कुठे उल्लंघन नको व्हायला त्यासाठी स्वतः ला थोडी सीमा घालून घ्यायला. हवीत. कोणता बिकट प्रसंग जर ओढवला तर निर्भय राहून सामना करता आला पाहिजे. त्यासाठी शिक्षण देखील उपयुक्त पडते., संगीता मासाळ यांच्या शाळेत येणाऱ्या मुली घरातील स्वयंपाक करून येतात. त्याचे कारण कुटुंबातील परिस्थिती,शिक्षणाचा अभाव, किंवा आई शेतावर काम ाला जाते त्यामुळे हे करणे भाग पडते. म्हणून त्या नेहमी प्रबोधन करताना सांगतात की कष्ट, मेहनत घेतली पाहिजे. हे करत असताना त्यांनी शाळेत साहित्यिक वातावरण निर्माण केले. मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करून, कविते विषयी मार्गदर्शन केले. तशी अभिरुची त्यांच्यात निर्माण झाली. त्यातील काही विद्यार्थी आज उत्तम कविता लिहू लागले आहेत. वक्तृत्वात हिरीरीने सहभाग नोंदवू लागली आहेत. सूत्रसंचालन उत्कृष्टपणे करू लागली आहेत. मुले ते संस्कार, विचार आत्म सात करतात हा आनंद त्यांना अपरिमित आहे. म्हणून मला इथे एका गाण्याची आठवण होते. गुरूने दिला ज्ञानरुपी वसा,आम्ही चालवू हा पुढे वारसा,जिथे काल अंकुर बिजातले, तिथे आज वेलीवरी ही फुले, फलद्रुप हा वृक्ष व्हावा तसा गुरू हा ज्ञानी असतो आणि त्यांच्या शुद्ध आचरणातून तो शिकत असतो. आज त्यांचे विद्यार्थी अनेक पदावर विराजमान आहेत, त्यातील किरण घोडके हा विद्यार्थी राजकारणात निपुण असून, त्याचा एक कविता संग्रह प्रकाशित आहे. तेजु पठाडे ही देखील उत्कृष्ट कविता लेखन करते. सिमरन, आणि हर्षाली या उत्तम सूत्रसंचालन ,आणि उत्तम भाषण करतात.कोणी डॉक्टर, कोणी इंजिनिअर, तर कोणी लेखक म्हणून पण घडले आहेत त्यांची पुस्तक प्रकाशित आहेत .आज ते आपल्या शिक्षकांना विसरले नाहीत तर आठवणीने येऊन भेट घेऊन, नमस्कार करून जातात. हेच तर गुरूच्या कष्टाचा महिमा आहे. संगीता मासाळ या वैविध्यपूर्ण लेखन करतात. त्यांच्या कविताही वेगवेगळ्या विषयांवर आहेत. कौटुंबिक आशया बरोबर काही लावण्याही शब्दबध्द केल्या आहेत.. निसर्ग तर (पान १० वर)

# जानेवारीत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी का झाली नाही?

## पाणीटंचाई आढावा बैठकीत खा. आष्टीकर यांचा अधिकाऱ्यांना सवाल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**

जानेवारी महिन्यात हिंगोली आणि सेनगाव येथील पाणी टंचाई आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत पाणी टंचाईवरील उपाययोजनासंदर्भात निर्णय घेण्यात आले परंतु या निर्णयाची अंमलबजावणी अजूनही झाली नाही तर सत्ताधारी आमदार काय करीत आहेत? अधिकारी, कर्मचारी काय करीत आहेत? असा संतप्त सवाल खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी सभागृहात विचारीत दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झालीच पाहीजे अशा सूचना उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांना केल्या.

येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात दि १९ मे रोजी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी हिंगोली व सेनगाव या तालुक्यातील पाणीटंचाई आढावा बैठक घेतली. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, संदेश देशमुख, उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे, चौतमल यांच्यासह हिंगोली व सेनगाव येथील पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचारी, सरपंच उपस्थित होते.

यावेळी पाणीटंचाई आढावा बैठकीत अनेक सरपंचांनी गावात भीषण पाणीटंचाई असल्याचे सांगत जानेवारी महिन्यात घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी खासदार आष्टीकर यांचेसमोर केल्या. यावेळी पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी चालढकलपणा करीत असून गावकऱ्यांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याच्या निदर्शनास आले.

यावेळी खासदार आष्टीकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत जानेवारी महिन्यात पाणीटंचाईवरील आढावा बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी का झाली नाही? असा सवाल करीत आंधळं दळतंय कुत्र पीठ खातंयअशी अवस्था झाली आहे. यावर अधिकारी गंभीर नाहीत, एकाही गोष्टीची अंमलबजावणी झाली नाही ही अत्यंत खेदाची बाब असून लोकप्रतिनिधींच्या बैठकीला काही महत्व आहे की नाही असा सवालही यावेळी त्यांनी केला. यामध्ये दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कार्यवाही करावी अशा सूचना उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांना केल्या आहेत.

या बैठकीला हिंगोली व सेनगाव तालुक्यातील जवळपास २१ ग्रामसेवक गैरहजर होते त्यामुळे त्या गावांची परिस्थिती समजू शकली नाही. त्यामुळे या गैरहजर ग्रामसेवकांवर कार्यवाही करण्याच्या सूचनाही आपण जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणार असल्याचे खासदार आष्टीकर यांनी सांगितले.

# कृषी सहायकांचे विविध प्रलंबीत मागण्यांसाठी आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**

कृषी सहायकांच्या विविध प्रलंबीत मागण्यांसाठी दि १९ मे सोमवारी येथील जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयासमोर कृषी सहायक संघटनेच्यावतीने आंदोलन करण्यात आले.

मागील अनेक वर्षापासून कृषी सहायकांच्या प्रलंबीत मागण्या आहेत. यापूर्वी संघटनेसोबत झालेल्या बैठकीत १५ दिवसांत मागण्या सोडवू असे आश्वासन देण्यात आले होते परंतु या मागण्यांची पूर्तता न झाल्यामुळे कृषी सहायक संघटनेकडून येथील जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयासमोर कृषी सहायकांनी धरणे आंदोलन सुरू केले आहे.

यावेळी कृषी सहायक संघटनेकडून करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये कृषी सेवक कालावधी रद्द करून कृषी सेवकांना नियमित कृषी सहायक पदावर नियुक्ती देण्यात यावी, कृषी सहायकाचे पदनाम बदलून सहायक कृषी अधिकार करावे, कृषी सहायकांना कामकाजासाठी लॅपटॉप उपलब्ध करून द्यावा, ग्रामस्तरावर कामकाजासाठी कृषी मदतनीस द्यावा, निवीष्ठा वाटप परमिटद्वारे करावे, तसेच वाहतुक भाडे द्यावे, आकृतीबंधास तत्काळ मान्यता द्यावी, पोक्रा योजनेत समुह सहाय्यकांची पदे पूर्वीप्रमाणेच भरण्यात यावीत, एमआरईजीएस योजनेंतर्गत लक्षांक देताना क्षेत्रीय स्तरावरील अडचणींचा विचार करून लक्षांक देण्यात यावे, नैसर्गिक आपत्तीच्या पंचनामे व त्यानंतरची कामे यासाठी न्यायसंगत कार्यपध्दती तयार करण्यात यावी, कृषी सहाय्यक संवर्गाच्या आस्थापना विषयक अडचणींची सोडवणूक करावी आदी मागण्यांचा समावेश आहे. मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे. निवेदनावर अध्यक्ष संतोष वाघमारे, सचिव श्रीनिवास शिंदे, राजेश भिसे, रमेश पोहनकर, वैजनाथ रणेर, संजीवनी शिंदे, छत्रपती वाव्हळ, लता हळदेवाड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कळमनुरीत तिरंगा रॅलीतून भारतीय जवानांच्या शौर्याला सलाम

**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, १९ मे**




ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने दहशतवादाच्या विरोधात नवीन लक्ष्मणरेषा रेखाटली आहे. या ऑपरेशनमधून संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भर भारताचे सामर्थ्य जगाला दिसून आले. भारतमातेच्या वीरपुत्रांनी गाजवलेले शौर्य ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे.

कळमनुरी येथे 'ऑपरेशन सिंदूर'मधील वीर जवानांच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा रॅली भाजपा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्या पुढाकाराने मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारावून गेले होते..याप्रसंगी १०८ महादेव शिवाचार्य महाराज, ह.भ.प. गजानन महाराज कळमकोंडेकर, जेष्ठ नेते नंदकिशोर मणियार, ओमप्रकाश मेने, दामुअण्णा शिंदे, सोनबा बुरसे, तुकाराम ढोणे, विलासराव भोसकर, डॉ. प्रकाश नाईक, अशोक संगेकर, भागवत ठाकूर, दिनकर कोकरे, एड.मनोज देशमुख ,भाजपा मंडळ अध्यक्ष विठ्ठल भोयर, डॉ. सुधाकर लोमटे, ओंकार नावडे, विकास ठाकूर, कैलास शिंदे, अरुण कदम, हनुमंत सूर्यवंशी, गणेशराव कड, ज्ञानेश्वर मुधोळ, गजानन शिंदे, मन्मथ गंगेवार बालाजी काळेवार, किरण कणके, योगेश संगेकर, रमेश दरक, किशोर पाठक पारस मांडवगडे, जिद्दी पाटील, राजू जाधव, सोपान घुगे, इंदुबाई राऊत, संगिता वानखेडे, सतीश कुलकर्णी, नारायण डुरे, बबन आप्पा पंचलिंगे कळमनुरी तालुक्यातील मोठ्या प्रमाणात नागरिक व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.



**हिंगोली– जिल्हा नियोजन समितीकडून हिंगोली जिल्हा पोलिस दलाला वाहनांसाठी निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीतून सोमवारी पोलिस दलाला वाहने उपलब्ध झाली असून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी या वाहनांची वितरण संबंधीत पोलिस ठाण्याचे प्रभारी यांना सूपूर्द केले आहेत.**

## संक्षिप्त वृत्त

### एल्डर लाईन १४५६७ ज्येष्ठांसाठी मदतीचा हात

हिंगोली– सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था आणि राज्य सरकारच्या सहकार्याने ''एल्डर लाईन १४५६७'' ही सेवा देशभरात वयोवृद्धांसाठी सुरू करण्यात आली आहे. जनसेवा फाऊंडेशन, पुणे यांच्यामार्फत ही सेवा महाराष्ट्रात राबवली जाते. मानवसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन जनसेवा फाऊंडेशन गेली ३७ वर्षापासून सातत्याने विविध प्रकल्पाद्वारे गरीब, आजारी, वृध्द, अपंग, निराधार, गरीब मुले–मुली आणि महिला यांची सेवा करीत आहेत. जनसेवा फाऊंडेशनला संयुक्त राष्ट्रसंघाचा विशेष दर्जा प्राप्त आहे. महाराष्ट्रात १४५६७ राष्ट्रीय टोल–फ्री हेल्पलाईन सेवेची अंमलबजावणी ऑगस्ट २०२१ पासून सुरू झाली आहे. या १४५६७ राष्ट्रीय टोल–फ्री हेल्पलाईनवर आतापर्यंत ४ लाखांहून अधिक कॉल्स आले असून ३० हजारांहून अधिक प्रकरणांमध्ये क्षेत्रीय पातळीवर प्रत्यक्ष मदत करण्यात आली आहे. या हेल्पलाईनद्वारे आरोग्य, पोषण, निवारा, आश्रयगृह व वृध्दाश्रम, डे केअर सेंटर याबाबतची माहिती देण्यात येते. तसेच कायदेविषयक, मालमत्ता व कौटुंबिक वादांमध्ये मोफत कायदेशीर सल्ला, पेन्शन योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम २००७ बाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. मानसिक आजार व चिंता, ताण, राग इत्यादी व्यवस्थापनाबाबत त्यांना भावनिक आधार दिला जातो. तसेच बेघर व अत्याचारग्रस्त वृध्दांसाठी मदत आणि पुनर्वसन, कुटुंबियांशी संवाद, पुनर्स्थापनेसाठी प्रयत्न, पोलीस प्रशासनाशी समन्वय व समुपदेशन आदी सेवा मोफत पुरविल्या जातात.

### मोरगे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



हिंगोली–शिक्षक फाउंडेशन द्वारा संचलित, महाराष्ट्र शिक्षक पॅनलचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार जि. प. प्रा. शा. जांभरूण आंध तांडा येथील उपक्रमशील शिक्षक राजकुमार मोरगे यांना प्रदान करण्यात आला. सायबर कॉलेज हॉल कोल्हापूर येथील दिमाखदार सोहळ्यामध्ये सिने अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर, प्रसिद्ध कवी रोहीत शिंग, अध्यक्ष दिपक चामे व इतर मान्यवर यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तांड्याच्या शाळेवर अध्यापनाचे कार्य करणारे राजकुमार मोरगे हे या अगोदरही अनेक पुरस्काराने सन्मानीत झाले आहेत. तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यामार्फत समग्र शिक्षा व झच् डक्ळख ग्रंथालय उपक्रम २०२४–२५ मध्ये राजकुमार मोरगे यांच्या चित्रगाणी या पुस्तकाची इयत्ता पहिली ते तिसरी च्या विद्यार्थ्यांना पूरक वाचन म्हणून निवडही करण्यात आली आहे.

# जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेहस्ते पिकल बॉल एरिनाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**



शहरातील तालुका क्रिडा संकुलाच्या परिसरात सोमवारी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेहस्ते पिकल बॉल एरिना अंतर्गत खेळाडूंसाठी बॅडमिंटन हॉलचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यापारी महासंघाचे माजी जिल्हाध्यक्ष रमेशचंद्र बगडीया यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी आत्माराम बोथीकर, क्रिडा शिक्षक आनंद भट्ट, डॉ मनिष बगडीया, सुनील चौधरी, विशाल अग्रवाल, राष्ट्रीय खेळाडू रूपेश चव्हाण यांची उपस्थिती होती. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी झालेल्या बॅडमिंटन हॉलचा खेळाडूंना निश्चितच फायदा होणार आहे. खेळाडूंनी नियमांचे पालन करीत सहकार्य करण्याचे आवाहन आयोजकांनी केले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी मार्गदर्शन करतांना खेळाचे जीवनात अनन्य साधारण महत्व असून खेळामुळे शारीरिक आणि मानसिक सक्षम बनण्यास मदत होते असे सांगितले.

यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने खेळाडू, पालक तसेच महिलावर्गही उपस्थित होता.

# कोपरवाडी शिवारात भरधाव टिप्परच्या धडकेत दोघे ठार तर चारजण जखमी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**

कळमनुरी तालुक्यातील कोपरवाडी शिवारात भरधाव टिप्परने धडक दिल्याने झालेल्या अपघातात कुपटी येथील दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला तर चारजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली असून जखमीना उपचारासाठी आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, वसमत तालुक्यातील कुपटी येथील मुळचे रहीवाशी असलेले संतोश माहोरे हे मागील काही वर्षापासून पुणे येथे राहतात. त्याठिकाणी खाजगी कंपनीमध्ये ते काम करतात. हिंगोली येथे नातेवाईकांच्या विवाह सोहळ्यांसाठी माहोरे कुटुंबीय हिंगोलीत आले होते. त्यानंतर त्यांची मुले अरूण संतोष माहोरे वय १८, अनिकेत संतोष माहोरे वय १६ हे त्यांचा मित्र अनिकेत मुळे यांच्यासह कोपरवाढी येथे आजी आजोबांना भेटण्यासाठी गेले होते.

रविवारी दि १८ मे रोजी दहा वाजण्याच्या सुमारास ते गावाजवळ थांबले असतांना रामेश्वरतांडा येथून तलावातील काळीमाती घेऊन कोपरवाडीकडै निघालेले टिप्पर कोपरवाडी येथील आबादानी येथे आले असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले या अपघातात टिप्परची रस्त्याच्या बाजूला असलेल्या सर्व सहा जणांना धडक बसली. या अपघातात सर्व सहाजण जखमी झाले. यामध्ये अनिकेत माहोरे, गजानन मुकाडे, संदीप मारकड, अरूण माहोरे, वैभव डुकरे, अनिकेत मुळे यांचा समावेश आहे. या अपघाताची माहीती मिळताच आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे पोनि विष्णुकांत गुठ्ठे, उपनि गणेश घोटके, जमादार सुनील रिठ्ठे, पिराजी बेले, राजीव जाधव, विजय जाधव, शिवाजी पवार यांचय पथकाने घटनास्थळी भेट देऊन जखमींना उपचारासाठी आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. मात्र अनिकेत माहोरे व अरूण माहोरे या दोघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले. मात्र नांदेड येथे डॉक्टरांनी त्याना तपासणीनंतर मृत घोषित केले.

# वसमत शहरात मोकाट जनावरांचा सुळसुळाट



**तभा वृत्त सेवा**
**वसमत, १९ मे**

शहरातील प्रमुख रस्त्यावर जनावरांचा झुंड बसलेला आढळत आहे. या मोकाट जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतोच मात्र अपघात देखील होत आहेत. याकडे नगर पालिका प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

या मोकाट जनावरांमुळे रस्त्यावरील वाहनचालकांच्या डोक्यावर कायम अपघाताची टांगती तलवार आहे. यामुळे वाहतुकीला देखील अडथळा निर्माण होत आहे. रस्त्यावर आपली जनावरे सोडून वाहतूक व नागरिकांना अडचण निर्माण करणाऱ्या मालकाविरुद्ध नगरपालिकेने कडक कारवाई करण्याची गरज आहे परंतु नगरपालिका प्रशासन मूग गिळून गप्प आहेत. जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. शहरातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे शहरातील प्रत्येक रस्त्यावर जनावरांचे झुंड बसलेले आढळत आहे शहरात नगरपालिकेचे कोंडवाडे असून देखील शहरातील रस्त्यावर मात्र मोकाट जनावरे पाहावयास मिळत आहे. नगरपालिकेचे कोंडवाडे हे फक्त नावालाच आहे शहरातील गल्लोगल्ली व मुख्य रस्त्यावर ही मोकाट जनावरे फिरताना झुंडच्या झुंड निदर्शनास येत आहे. सायंकाळच्या वेळी तर हीच मोकाट जनावरे भर रस्त्यावर झुंडच्या झुंडी बसत आहेत शहरातील प्रमुख मार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते यातच रस्त्यावर मोकाट जनावर रस्त्याच्या मधोमध बसलेली दिसत आहे. याकडे नगर परिषद मात्र दुर्लक्ष करत आहे आता आपल्या शहराचा विचार करून विविध सामाजिक संघटनेने ही मोकाट जनावरे किमान गोशाळेपर्यंत पोहोचवावी किंवा गोशाळेने ही जनावरे आपल्या ताब्यात घेऊन शहरातील होणाऱ्या अपघातास टाळावे असे मत सुजान नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# तहसील कार्यालयात दलालांचा सुळसुळाट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**

येथील निराधार योजनेतील वयोवृध्द लाभार्थींना अनुदान मिळण्यासाठी तहसील कार्यालयात सकाळपासून निराधार योजनेच्या कार्यालयात गर्दी होत आहे. परंतु दलालांच्या मार्फत गेल्यानंतरच लाभ मिळत असल्याच्या तक्रारी लाभार्थी करीत आहेत.

सध्या येथील तहसील कार्यालयातील निराधार योजनेंतर्गत मिळणारे अनुदान बंद पडल्यामुळे वयोवृध्द नागरिक कागदपत्रे सादर करण्यासाठी तळपत्या उन्हात पायी येत आहेत. परंतु या ठिकाणी दलालांच्या मार्फत गेल्यास त्यांचे कामे होत आहेत तर ज्यांना कोणीच वाली ाहीत अशांना चकरा माराव्या लागत आहेत. त्यांचे फाईलही धुळखात पडत असल्याच्या तक्रारी वयोवृध्द नागरिक करीत आहेत.

# आगामी निवडणुकांसाठी भाजप सोडून अन्य पक्षांसोबत युती : ॲड. बाळासाहेब आंबेडकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड दि. १९ मे-**

आगामी महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष सोडून इतर कोणतीही पक्षाशी युती करण्यात येईल. मात्र त्या, त्या जिल्हा कमिटींना युती संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार दिला आहे, अशी माहिती वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख तथा माजी खा. बाळासाहेब आंबेडकर यांनी दिली.एका खाजगी कामानिमित्त ॲड. बाळासाहेब आंबेडकर नांदेड दौऱ्यावर आले होते. त्याप्रसंगी ते पत्र परिषदेत बोलत होते.

पुढे बोलतांना वंचित आघाडीचे प्रमुख ॲड. आंबेडकर म्हणाले की, सुप्रीम कोर्टाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. इतर मागासवर्गीयांचे आरक्षण जसच्या तसं ठेवून या निवडणुका होणार आहेत. परंतु शासनाने प्रभाग रचना तात्काळ जाहीर कराव्यात. जसे गत विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम घोटाळा झाला तसा अधिकाऱ्यांचा घोटाळा उदयास आला आहे. वेळ संपल्यानंतर मतदान झाल्याचं दाखवलं जातय परंतु सायंकाळी ६ नंतर सीसीटीव्ही, स्लिप बाटायची नेमकी माहिती दिली जात नाही. त्याबाबत



केंद्रीय निवडणूक आयोगाला वारंवार खुलासा करावा लागत आहे. बीस दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने विधानसभेत सहा वाजल्यानंतर ६५ लाख मतदान झाल्याचे जाहीर केले. ज्या अधिकाऱ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सिम्बॉल वाटपाचा अधिकार दिला आहे, त्यांची फेर तपासणी करावी अशी मागणी ही त्यांनी यावेळी केली. पुढे बोलताना ॲड. आंबेडकर म्हणाले की, राज्य शासनाने प्रभाग रचना, बार्ड रचना यांची फोड करून त्वरित जाहीर करावी. तसेच राज्य निवडणूक आयोगाने डिलीमिनेशन कमिटी स्थापन करून त्यांच्याकडे न. प., मनपा, जि प. पं. स.च्या निवडणुकीत प्रभागाची रचना करण्याची जबाबदारी द्यावी. ज्या जिल्ह्यांमध्ये सदर जबाबदारी दिली जाईल त्या अधिकाऱ्यांचे नाव त्या त्या जिल्ह्यातील वर्तमानपत्रांमध्ये जाहीर करावे. त्यामुळे कार्यकर्त्यांना तथा निवडणूक लढविण्यारांना त्याची सखोल माहिती होईल, तर आगामी निवडणुकांसाठी भाजप सोडून अन्य पक्षांसोबत युती करण्यात येईल. मात्र त्या, त्या जिल्हा कमिटींना युती संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार दिला आहे, अशी माहिती बंचित बहुजन आघाडीचे प्रमुख तथा माजी खा. बाळासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

# शहीद जवान सचिन वनंजे यांच्या कुटुंबियांची पालकमंत्री अतुल सावे यांनी घेतली सात्वंनपर भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड दि. १९ मे-**




देगलूर तालुक्यातील तमलूर या गावाचे भुमिपूत्र शहीद जवान सचिन यादवराव वनंजे यांच्या कुटूंबियाची राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आज देगलूर येथील त्यांच्या घरी सात्वंनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी काळजी करु नका, शासन सदैव आपल्या पाठीशी असून, मी स्वत: लक्ष घालून सर्व मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीन अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाशक कुमार, देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसीलदार भरत सूर्यवंशी, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीलिमा कांबळे आदिची उपस्थिती होती. देगलूर तालुक्यातील तमलूर या गावाचे भुमिपूत्र शहीद जवान सचिन यादवराव वनंजे यांचे ६ मे रोजी कर्तव्यावर असतांना मृत्यू झाला. भारतीय लष्करातील जवान सचिन यांचा मृत्यू ही अतिशय दुःखद घटना आहे. सचिन यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असून त्यांच्या पत्नीला व भावाला त्यांच्या शिक्षणानुसार नोकरीसाठी योग्य ती मदत करण्यात येईल. तसेच त्यांना शासनाच्या योजनेच्या माध्यमातून पक्के घरकुल देण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.त्यांच्या पेन्शनची कार्यवाही व शासनाकडून इतर सर्व देय मदत व लाभ वेळेत मिळतील यादृष्टीने मी स्वत: पाठपुरावा करीन असेही त्यांनी यावेळी सांगितले. याबाबत मदत त्वरीत मिळण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे, अशी सूचना पालकमंत्री अतुल सावे यांनी केली. यावेळी त्यांनी त्यांचा एक महिन्याचा पगाराचा धनादेश शहीद जवान सचिन वनंजे यांच्या कुटूंबियांना सुर्पूद केला.

## संक्षिप्त वृत्त

### स्वारातीम विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अभ्यास मंडळावर प्रो. अरविंद सरोदे

**नवीन नांदेड-** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र संकुलातील प्रा. डॉ. अरविंद सरोदे यांचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी भौतिकशास्त्र अभ्यास मंडळावर नामनिर्देश केले आहे. डॉ. सरोदे हे मागील २१ वर्षापासून विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र संकुलात पदार्थविज्ञान विषयाचे अध्यापनाचे कार्य करीत असून संशोधन कार्यालयात सुद्धा सक्रिय आहेत. त्यांचे ५० पेक्षा अधिक शोधनिबंध हे उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आत्तापर्यंत ०४ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केलेली असून सहा विद्यार्थी व काही परदेशी विद्यापीठातील विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत कौशल्याधारित अभ्यासक्रमाचे पदवी व पदवीचा अभ्यासक्रमात समावेश करून उत्कृष्ट अभ्यासक्रमाची रचना व मांडणी करून ते विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करून विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा आंतराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, भौतिकशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. कमलाकर कणसे, भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. अशोक कुंभारखाणे, जनसंपर्क अधिकारी डॉ.अ अशोक कदम, सहाय्यक कुलसचिव रामदार पेद्देवाड यांच्यासह शिक्षक, अधिकारी व कर्मचारी आदींनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### स्व.मोतीराम राठोड यांचे निधन

**देगलूर-**तालुक्यातील मौजे गवंडगाव तांडा येथील रहिवाशी जेष्ठ नागरिक स्व. मोतीराम खेमा राठोड यांचे दि. १८ मे २०२५ वार रविवार रोजी रात्री १० वाजता वयाच्या ९५ व्या वर्षी वर्धापकाळाने दुःखद निधन झाले असून अंत्यविधी दि. १९ मे २०२५ वार सोमवार रोजी सकाळी ११:३० वाजता त्याच्या राहत्या गावी गवंडगाव तांडा येथे होणार आहे. त्यांच्या पश्यात दोन मुलं, चार मुली, जावई, सून, नातवंड असा खुप मोठा परिवार आहे.सावित्रीबाई फुले विद्यालयाचे शिक्षक तथा दैनिक तरुण भारत चे प्रतिनिधी विशाल पवार यांचे ते आजोबा होत.



# बेल्लोरी येथील जीर्ण वीज खांब बदलण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**किनवट दि. १९ मे-**

मौजे बेल्लोरी (ता. किनवट, जि. नांदेड) येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल दारगुलवार यांनी गावातील जीर्ण आणि गंजलेल्या वीज खांबांमुळे होणाऱ्या संभाव्य धोक्याबाबत चिंता व्यक्त करत महावितरणच्या सहाय्यक अभियंता, किनवट शाखा यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात त्यांनी बेल्लोरी गावाला वीज पुरवठा करणारे लोखंडी खांब तत्काळ बदलण्याची मागणी केली आहे.राहुल दारगुलवार यांनी निवेदनात नमूद केले आहे की, बेल्लोरी गावातील वीज पुरवठ्यासाठी वापरले जाणारे लोखंडी खांब मुळापासून जीर्ण झाले असून ते पूर्णपणे गंजले आहेत. यामुळे हे खांब कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता आहे. विशेषतः आगामी पावसाळा आणि वादळी वाऱ्याच्या दिवसांत या खांबांमुळे गंभीर अपघात किंवा अप्रिय घटना घडण्याचा धोका आहे. यामुळे गावकऱ्यांच्या जीविताला आणि मालमत्तेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो.गावातील वीज खांबांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. अनेक खांब गंजून कमकुवत झाले आहेत. पावसाळ्यात वीज खांब कोसळून अपघात होण्याची भीती आहे. यामुळे महावितरणने तातडीने या खांबांची पाहणी करून ते बदलावेत, अशी विनंती राहुल दारगुलवार यांनी निवेदनात केली आहे. स्थानिक ग्रामस्थांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवला असून, गावातील वीज खांबांच्या दुरवस्थेबाबत वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे सांगितले. यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे. निवेदनात पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, जर वेळीच खांब बदलण्याची कार्यवाही झाली नाही, तर भविष्यात होणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेस महावितरण प्रशासन जबाबदार राहील. सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा किनवट यांनी निवेदन स्वीकारले असून, लवकरच याबाबत पाहणी करून योग्य ती कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी महावितरण प्रशासनाकडून तातडीने कारवाईची मागणी केली आहे, जेणेकरून पावसाळ्यापूर्वी हा धोका टाळता येईल.

# संस्कृती संवर्धन मंडळाच्या कार्याचे पालकमंत्र्यांकडून कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**सगरोळी दि. १९ मे-**



चला जाणूया नदीला या अभियानांतर्गत सुरू असलेल्या मन्याड नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाची नांदेड चे पालकमंत्री. अतुल सावे यांनी १९ मे रोजी पाहणी केली. सध्या वझरगा परिसरात नदीपात्रातील गाळ काढण्याचे आणि रुंदीकरणाचे काम वेगाने सुरू असून, या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची मंत्री सावे यांनी सकारात्मक दखल घेतली. या कार्यात पुढाकार घेणाऱ्या संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी या संस्थेचे त्यांनी मन:पूर्वक कौतुक करत, हे पर्यावरणपूरक आणि लोकसहभागातून चालणारे कार्य भविष्यातील पिढ्यांसाठी अत्यंत मोलाचे ठरेल. शासनातर्फे यासाठी आवश्यक सर्व सहकार्य दिले जाईल, असे आश्वासनही दिले.नद्यांचे पुनरुज्जीवन काळाची गरज मन्याड नदी ही नांदेड जिल्ह्याच्या पूर्व भागातील अनेक गावांसाठी जीवनवाहिनी आहे. मात्र अलीकडच्या काळात गाळ साचणे, अतिक्रमण आणि प्रदूषणामुळे नदी मृतप्राय झाली होती. ही गंभीर बाब लक्षात घेऊन संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी, नाम फाउंडेशन, स्थानिक ग्रामस्थ आणि प्रशासन यांनी एकत्र येत नदी पुनरुज्जीवनाचा विडा उचलला आहे.या अभियानांतर्गत गाळ काढणे, पात्र रुंदीकरण, वृक्षलागवड, जनजागृती आणि दीर्घकालीन व्यवस्थापन अशा अनेक घटकांवर भर दिला जात आहे. पाहणी दरम्यान मंत्री सावे यांचा संवाद पाहणी दौऱ्यात पालकमंत्र्यांनी विविध टप्प्यांवर सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला. त्यांनी जलनायक प्रमोद देशमुख, स्थानिक स्वयंसेवक आणि शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अनुभवांची माहिती घेतली. तरुणांचा, ग्रामस्थांचा व विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असल्याचे त्यांनी विशेषत्वाने उल्लेखले. देगलूर येथे महत्त्वपूर्ण बैठक पाहणीनंतर देगलूरच्या शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत पालकमंत्री अतुल सावे, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले व संस्थेचे प्रमुख प्रमोद देशमुख, उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळीच्या जलसंधारण, महिला सक्षमीकरण, शेतीतील नवकल्पना, शैक्षणिक उपक्रम आदी कार्याचा आढावा मांडला. पालकमंत्र्यांनी या कार्यपद्धतींचे भरभरून कौतुक केले.समाजातील सहभागातून जलसंवर्धन या उपक्रमात स्थानिक तरुण, महिला, शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी, सामाजिक संस्था यांचा मोठा सहभाग असून, नदी पुनरुज्जीवन हे केवळ पर्यावरण रक्षण नव्हे, तर सामाजिक एकात्मता व भविष्यातील जलसुरक्षेसाठी केलेले ठोस पाऊल असल्याचे उपस्थित मान्यवरांनी स्पष्ट केले.

# तब्बल २० वर्षानंतर एकत्र येत वर्ग मित्रांचे रंगले गेट टुगेदर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड दि. १९ मे-**

एकेकाळी दहावी-बारावीत सोबत शिकलेल्या तत्कालीन २००५-२००७ बॅचच्या वर्गमित्रांनी तब्बल २० वर्षानंतर एकत्र येत स्नेहमिलन संमेलन सोहळा अर्थात गेट-टुगेदर कार्यक्रम यात्री निवास माहूर येथे रविवारी १८ मे रोजी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित जुन्या आठवणींना उजाळा देत मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी वीस वर्षानंतरच्या भेटीदरम्यान शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन जीवनातील जुन्या आठवर्णीना उजाळा देताना काहींच्या चेहऱ्यावर हास्य उमलले तर काहींचे जुन्या आठवर्णींनी डोळे पाणावले.

माहूर तालुक्यातील आष्टा येथील श्री शंकरराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या २००५- २००७ दहावी, बारावीच्या वर्गमित्रांनी तब्बल वीस वर्षानंतर एकत्र येत स्नेहसंमेलन सोहळा आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला वर्गमित्र सागर बंडू वाघ (नखेगाव) आणि जगदीश प्रकाश वाघमारे ( शे.फ.वजरा) यांच्या दुःखद निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

शालेय विद्यार्थी पुढे मोठे होऊन, पुन्हा एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा देतात तो इव्हेंट म्हणजे गेट टुगेदर. प्रत्येक गेट टुगेदरच्या संकल्पना वेगवेगळ्या असतात. रोजच्या तानतणावाच्या धकाधकीच्या आयुष्याला कंटाळलेले, रोजच्या विवंचनेतून वाट काढता काढता नाके नऊ आलेले सह मित्रांना त्यांच्या अडीअडचणी मुळे येणे शक्य होत नसल्याचे शल्य बोलून दाखवतात तर यजमान मंडळी सगळं सोडून हा इव्हेंट कसा सक्सेसफुल होईल याची काळजी करतात. माहूर येथे आयोजित गेट टुगेदर सारख्या मैत्री अधिक वृद्धिंगत करण्याऱ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून विचार व्यक्त करताना अनेकांनी गेट टुगेदर आयोजित करण्यामागचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले कि, सदरील कार्यक्रमातून एकमेकांच्या कल्पनांना खतपाणी घालता येते. चर्चा करता येते. एकमेकांना नवीन गोष्टी शिकवता व शिकता येतात. आयुष्यात संघर्ष करत असताना एकमेकांना काही क्षण हसवत आनंद वाटण्याची हीच वेळ असते. वयोमानानुसार जुन्या मित्रांना समक्ष भेटण्याची संधी सोन्यासारखी वाटते. बिझनेस वाढ होण्यासाठी वातावरण निर्मिती करता येते. एकमेकांना मदत मागू शकतो. आम्हाला इतर लोकांच्या यशाचा हेवा वाटत नाही आणि एकमेकांच्या कर्तृत्वाचा सक्रियपणे उत्सव साजरा करतो. आम्ही एकमेकांवर प्रामाणिक, रचनात्मक टीका करतो.जेणेकरून मित्राचे भले व्हावे हाच मुख्य हेतू आहे. मैत्रीचा सार्थ अभिमान दाखवण्याची संधी यामुळे उपलब्ध झाली आहे. आम्ही एकमेकांचे आवाज ऐकतो. नाचतो, गातो. एकमेकांची मदत कशी करता येईल, सोयरिक जमवण्याची बोलणी. मदतीची देवाण घेवाण.धंद्याच्या नवीन संकल्पना आणि त्याबाबत शंका निरसन. विवंचनेतून बाहेर पडण्यासाठी मित्रांची मदत घेणे. आपण एकमेकांसाठी आहोत त्याची उजळणी झाली. नवीन ताकद घेऊन भरारी करण्याची वृत्ती तयार झाली.



अशा किती तरी गोष्टी शिकायला व अनुभवायला मिळाल्या आहेत या गेट टुगेदर मधून. तर एकंदरीत या गेट टुगेदर मधून सारांश असा निघाला कि,मित्रांनो, नका त्या नकारात्मक विचारसरणीच्या जाळ्यात अडकू. मला कुणाची गरज नाही हे जरी मान्य असले तरी इतरांना तुमची गरज असते हे विसरू नका. नाते कुठलेही असो ते वृध्दींगत करून, सर्वांना बरोबर घेऊन चालणे यालाच भावनिक बुद्धिमत्तेचा वापर म्हणतात ना. जर हे स्किल तुमच्यामध्ये नसेल तर मित्रा तुझ्या पैशाचा, अहंचा, वैभवाचा वापर ठराविक काळापर्यंत गोड लागेल व नंतर निर्भेळ मैत्रीसाठी मात्र पोरके झालेलं असाल. सुदामा आणि कृष्ण आपल्यातच आहेत हे ध्यानात ठेवले तर गेट टुगेदर तुम्ही वर्षातून अनगणीत वेळा एन्जॉय करू शकता. हा निर्भेळ, निस्वार्थ मैत्रीचा संदेश देऊन गेला.

प्रास्ताविकातून जितू चोले यांनी मित्रांसाठी कोणती जात धर्म हे न विचारता वर्ग मित्र म्हणून भविष्यात कुठल्याही वेळप्रसंगी सर्वांनी एकत्र येण्यासाठी आवाहन केले.यावेळी अतुल केशवे, पवन भोपळे यांनीदेखील वर्गातील जुन्या आठवणींना उजाळा देत आपण मित्रांसाठी आपला वेळ काढून हजर झालो आणि भविष्यात असे कार्यक्रम घेण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन एकमेकांच्या सुखदुःखात एकत्र येऊन अडीअडचणी सोडवण्या साठी एकत्र येण्याचे वचन दिले.

कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर सर्वांनी एकत्र बसून स्नेहभोजन केले. असाच कार्यक्रम पुढे दरवर्षी घेण्यात येणार असल्याचे संयोजकांकडून सांगण्यात आले. याप्रसंगी उपस्थित सर्व मित्रांनी प्रत्येकाच्या सुख दुःखामध्ये एकमेकांना साथ देण्यासाठी सहकार्य करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमासाठी २००५-२००७ बॅचचे जवळपास चालीस ते पन्नास वर्गमित्र सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या वर्गमित्रांपैकी जवळपास १५ शासकीय नोकरीत असून, काही खाजगी जॉब , काही स्वव्यवसाई तर काही शेती करून आपले जीवन यापन करतात.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रफुल सुरोशे, जितू चोले,अमितराठोड,अतुल केशवे,सागर देवकर यांच्यासह अनेकांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी स्वप्निल गोरे, नितीन जाधव, श्रीकांत शेवाळे, अमोल मोहिते, नारायण चव्हाण, शिक्षक बाळू राठोड , आफरोज पठाण, वैभव येरावार, सचिन पवार, शिवराज राठोड, उकंडा राठोड, इरफान फारुकी, प्रफुल वंजारे, शांताराम काळबांडे, मनोहर राठोड, प्रवीण पोटेकर,निलेश जोगदंड, गजानन पाटे, संजय राठोड, रवीकांत भगत यांच्यासह मोठ्या संख्येने वर्ग मित्र उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित राठोड प्रास्ताविक जितू चोले आणि कार्यक्रमाची आभार सांगता प्रफुल सुरोशे यांनी केली.

# आ. चिखलीकर यांनी स्वीकारली उपविधीमंडळ समिती प्रमुख पदाची जबाबदारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड दि. १९ मे**

माजी खासदार तथा लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची उपविधी मंडळ समिती प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली होती. आज आ. चिखलीकर यांनी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत उपविधीमंडळ समिती प्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारली आहे. मुंबईत विधानभवनात हा पदभार सुपूर्द करण्याचा कार्यक्रम पार पडला.



मुंबईत विधान भवन येथे आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे , विधान परिषदेचे सभापती राम शिंदे , विधानसभा अध्यक्ष एडवोकेट राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती श्रीमती नीलमताई गोऱ्हे , विधानसभा उपसभापती अण्णा बनसोडे , लोक लेखा समितीचे प्रमुख विजय वडेट्टीवार यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत महाराष्ट्र विधानमंडळाच्या सर्व समित्यांचा एकत्रित उद्घाटन कार्यक्रम आज पार पडला . नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांना उपविधानमंडळ समिती प्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली .

